24 TO 30 MAY 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 22/05/2021 7:00 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : २२ सोमवार दि. २४ मे २०२१ ते रविवार दि. ३० मे २०२१ पाने : ४ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


# संचारबंदी, लॉकडाऊन सरकारची सुरु आहे धावाधाव
# आजार लपवणारेच वाढवत आहेत कोरोनाचा प्रादुर्भाव



सांगली/वरिष्ठ प्रतिनिधी

सध्या संपूर्ण जग कोरोनाच्या विळख्यात सापडलेले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत चालला आहे. लॉकडाऊन सारख्या उपाययोजना करून सुद्धा कोरोना आटोक्यात येत नसल्याने जगाची सगळ्या यंत्रणा हतबल झालेल्या आहेत. महाराष्ट्र सरकारने कोरोनाची साखळी तोडण्याची मोहीम हाती घेतली आहे, पण तिला लोकांकडूनच हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसत आहे. कारण लोक कोरोनाच्या भीतीने आजार लपवीत आहेत. ताप, सर्दी, खोकला यासारखे कोरोनाची लक्षणे असलेले आजार झाले ...पान २ वर

## माणसाच्या जीवनाशी खेळणारे बोगस चाचणी अहवाल!

कोरोनाच्या या भयंकर संकट काळात लोकांची फसवणूक करून प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे काही हरामखोर तयार झालेत. जे हजार–पाचशे रुपयांमध्ये स्वॅब टेस्ट न घेताच आरटी पीसीआर सारख्या चाचण्यांचे बोगस निगेटिव्ह अहवाल देत आहेत. अशा दोघांना ठाण्यात पोलिसांनी अटक केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अटक करण्यात आलेले हे दोघे ठाणे महापालिकेच्या आरोग्य खात्यातील कंत्राटी वॉर्डबॉय असून अफसर मांगवाना आणि सांगपाल धावणे अशी त्यांची नावे आहेत. या पूर्वी त्यांनी दगावलेल्या कोरोना रुग्णांच्या नावेही आरटी पीसीआर चाचणीचा बोगस अहवाल दिलाय. अशा प्रकारचे लोक खूपच धोकादायक आहेत. कारण त्यांनी जर पैसे घेऊन पॉझिटीव्ह रुग्णाला निगेटिव्ह अहवाल दिला, तर तो कोरोना बाधित लोकांमध्ये फिरून किती लोकांना कोरोना बाधित करील याची कल्पनाही करवत नाही. हे दोघे स्वॅब न घेताच स्वॅब स्टिक लॅबमध्ये जमा करायचे, त्यामुळे स्वॅब स्टिकवर स्वॅबचा नसल्याने अहवाल निगेटिव्ह येत असे हि बाब पोलिसांच्या निदर्शनास येताच त्यांनी या दोघांच्या मुसक्या आवळल्या.

## संपादकीय

### पंतप्रधानांचा प्रांतवाद!

मुंबईतील वाढती लोकसंख्या आणि त्याचा इथल्या नागरी सुविधांवर आणि स्थानिक जनतेच्या रोजगारावर परिणाम याविषयी बोलणाऱ्या राज ठाकरे यांना इथल्या सगळ्या राजकीय पक्षांनी खास करून भाजपवाल्यांनी प्रांतवादी ठरवले होते का? तर म्हणे ते नेहमी इथल्या मराठी माणसाबद्दल मराठी अस्मितेबद्दल मराठी भाषेबद्दल बोलतात म्हणून ते प्रांतवादी! मग आता चक्रीवादळात झालेल्या नुकसानीची पाहणी करण्याकरता पंतप्रधान मोदी गुजरातला कसे पहिल्यांदा गेले? त्यांना महाराष्ट्रातल्या नुकसानी विषयी माहिती मिळाली नव्हती का? चक्रीवादळाने फक्त गुजरातचेच नुकसान केले आहे का? पंतप्रधान हा कुठल्या एका राज्याचा नसतो तर देशाचा असतो. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्या ज्या ठिकाणी लोकांचे नुकसान झालेय त्या त्या ठिकाणी पंतप्रधानांनी जाऊन तिथल्या लोकांना मदतीचा हात द्यायचा असतो. तोक्ते चक्रीवादळात महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे या जिल्ह्यांसह राजधानी मुंबईचे सुद्धा मोठे नुकसान केले आहे. या चक्रीवादळात झाडे, घरे, विजेचे खांब उन्मळून पडलेत. अजूनही कोकण किनारपट्टी अंधारात आहे. मोबाईल चार्जिंग करता येत नसल्याने कोकणातील लोकांचा त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क तुटला आहे. घरे कोसळून जवळपास १० लोकांचा मृत्यू झाला. अनेक लोक जखमी झाले. पण एवढे मोठे संकट कोसळून सुद्धा पंतप्रधान कोकणाकडे फिरकले नाहीत. मात्र आपल्या गुजराती बांधवांची विचारपूस करायला त्यांना तातडीने मदत करायला ते गुजरातला गेले. कारण गुजरात ही त्यांची जन्मभूमी आहे. त्यामुळे स्वाभाविकच अशा संकटाच्या काळात त्यांची गुजराती अस्मित जागी होणारच! मग आता पंतप्रधान प्रांतवादी नाहीत का? राज ठाकरेंना प्रांतवादी ठरवणारे भाजपतील शेटजी आणि भटजी आता कुठे गेले? आपल्या गुजराती नेत्याचा हा प्रांतवाद त्यांना दिसत नाही का? देशातील आणि खास करून महाराष्ट्रातील लोकांनी आता याच गोष्टीचा विचार करायला हवा. कारण पंतप्रधान पदासारख्या सर्वोच्च पदावर असलेल्या माणसाला जर प्रादेशिक अस्मिता विसरता येत नाही, तर राज ठाकरे किंवा इतर मराठी माणसांनी आपली मराठी अस्मिता का विसरावी? तोक्ते चक्रीवादळाने केरळ, गोवा, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान या पश्चिम किनारपट्टीवरील सर्वच राज्यांना जोरदार तडाखा दिलाय. लोक कोरोनाच्या विळख्यात अडकलेले असतानाच या चक्रीवादळाने लोकांना आणखी खड्ड्यात घातले. अशावेळी केंद्राने आणि खास करून पंतप्रधानांनी आपल्या राज्याचा विचार करण्याऐवजी इतर राज्यांकडे सर्वात प्रथम लक्ष द्यायला हवे. पण महाराष्ट्र, केरळ आणि राजस्थान मध्ये विरोधी पक्षाची सरकारे आहेत. तिकडे केंद्राचे कसे लक्ष जाईल आणि गुजरात ही तर दस्तुरखुद्द पंतप्रधान मोदी यांची जन्मभूमी. अशावेळी प्रत्येकाला आपल्या माती विषयी आत्मीयता असतेच. म्हणूनच पंतप्रधान पहिल्यांदा गुजरातला गेले आणि त्यांनी गुजरातला एक हजार कोटींची मदत जाहीर केली आणि त्यांनी आपली गुजराती अस्मिता जपली. तर मग त्याचे जे इथले लोक आहेत त्यांनी मराठी अस्मिता जपणाऱ्या मराठी माणसांना नावे ठेऊ नयेत. त्यांना प्रांतवादी ठरवू नये. कारण प्रत्येकाला आपल्या राज्याविषयी, आपल्या भाषा आणि संस्कृती विषयी अभिमान असतो. तो त्यांनी जपायलाच हवा. अशावेळी मराठी अस्मिता जपणाऱ्या मराठी माणसाला जर कुणी प्रांतवादी ठरवीत असेल तर संकट काळात गुजरातचा प्रथम दौरा करून गुजराती अस्मिता जपणारे मोदी हे सुधा प्रांतवादी नाहीत का? कोरोनाच्या संकटकाळात महाराष्ट्रावर दोन वेळा चक्रीवादळाचे संकट आले आणि ज्या भागाला या चक्रीवादळाचा तडाखा बसला त्या कोकण किनारपट्टीवरील लोक गरीब आहेत. पुरेशी शेती नाही, फारसे उद्योगधंदे नाहीत. बड्या कंपन्यांच्या ट्रॉलरमुळे इथला छोटा मच्छीमार उपाशी मरतोय. अशा एकना अनेक संकटाचा मुकाबला करीत कोकणी माणूस कसे तरी जीवन जगतोय. अशा वेळी जेंव्हा चक्रीवादळासारखी नैसर्गिक आपत्ती येते, तेंव्हा कोकणी माणूस उध्वस्त होतो. त्यामुळे या माणसाला केंद्र अथवा राज्य सरकारकडून तातडीने सरकारी मदत मिळायला हवी. त्यासाठी मुख्यमंत्री, पंतप्रधान यासारख्या प्रमुख लोकांनी पुढाकार घ्यायला हवा. पण प्रत्येकजण आपापल्या राज्याचा पहिला विचार करतोय. देशाच्या एकात्मतेसाठी हे काही चांगले चित्र नाही. पंतप्रधानांनी गुजरातला आवश्य भेट द्यावी, अन् तत्पूर्वी गोवा आणि महाराष्ट्रातल्या नुकसानग्रस्त जिल्ह्यांची पाहणी करायला हवी. पण त्यांनी अगोदर गुजरात गाठून मोठी चूक केली आहे. आता त्यांच्या याच चुकीवर पांघरून घालण्यासाठी व आम्हाला कोकणची किती काळजी आहे हे दाखवण्यासाठी त्यांच्या पक्षाचे महाराष्ट्रातील काही प्रमुख लोक कोकण दौऱ्यावर गेले आहेत. पण तिथे त्यांना उद्या स्थानिक जनतेने विचारले की पंतप्रधान कुठे आहेत, तर काय उत्तर देणार? संकटाच्या काळात भलेही लोकांना मदत करता आली नाही, तरी त्यांना मानसिक आधार देणे खूप गरजेचे असते. पंतप्रधानांनी गुजरात ऐवजी गोवा आणि लोकांचा दौरा करून तिथल्या पिढीत जनतेचे अश्रू पुसले असते, तर त्यांना किती बरे वाटले असते. पण आता हा गुजराती माणूस अगोदर गुजराती लोकांची विचारपूस करायला गेला, पण आमच्याकडे मात्र त्याने ढुंकूनही पाहिले नाही अशी कोकणी माणसाच्या मनात मोदी विषयी तिरस्काराची भावना निर्माण झालीय, ती सहजासहजी बदलणार नाही. त्याचबरोबर प्रांतवादी हा शब्द आता राज ठाकरे यांच्याऐवजी मोदी यांनाच फीट बसतोय. त्यामुळे भविष्यात राष्ट्रीय राजकारणात काम करताना संपूर्ण देशाचा विचार करायचा की अगोदर गुजरातचा विचार करायाचा हे त्यांचे त्यांनीच ठरवावे.

## सातबाऱ्यावरून त्याने वहिनीचे नाव काढले जाब विचारताच दिराने तिला यमसंधानी धाडले

जळगाव/क्राईम रिपोर्टर

संपत्तीचा वाद माणसाच्या प्राणावर बेततो आणि त्यातून कधी कधी कुटुंबातली माणसेच हैवान बनून आपल्या रक्ताच्या नात्यातील माणसाला संपवतात. अशावेळी कुटुंबातील एखादी विधवा एकाकी पडली की पाठीशी उभे राहण्याऐवजी कुटुंबातील माणसे तिला तिच्या हक्कापासून वंचित करण्यासाठी तिचा जीव घ्यायलाही मागेपुढे पाहत नाहीत. जळगाव मधील पिंप्राळा येथे पतीच्या निधनानंतर विधवा झालेल्या योगीताच्या बाबतीत असेच घडले. कुटुंबातील लोकांनी तिला संपत्तीतून बेदखल करण्याचा निर्णय घेतला. यावेळी तिचे जमिनीच्या सात बऱ्यावरील नावही काढण्यात आले आणि तिने दिराला याचा जाब विचारताच दिराने कुऱ्हाडीचे घाव घालून तिची हत्या केली. मात्र या घटनेला तिचा मुलगा साक्षीदार असल्याने त्याच्या जबानीवरून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



मयत योगिता





आरोपी दिपक

मालमत्तेचा वाद कित्येकदा हाणामारीच्या व खूनाच्या थराला देखील जात असतो. मालमत्तेच्या वादातून एका विवाहितेचा तिच्याच दिराने कुऱ्हाडीने घाव घालत खून केल्याची घटना जळगाव येथे २१ मे रोजी घडली. जळगाव शहरातील पिंप्राळा या उपनगरातील मयुर कॉलनी भागातील विधवेच्या निघृण हत्येच्या घटनेने जळगाव शहरात खळबळ माजली आहे. खून केल्यानंतर देखील मयत विधवेचा दिर हातात कुऱ्हाड घेऊन परिसरात दहशत निर्माण करत होता. यावरुन खूनी दिर किती निर्ढावलेला होता हे लक्षात येते. या घटनेने समाजमन सुन्न झाले आहे. या घटनेने अनेकांच्या जिवाचा ...पान २ वर

## अप्राकृतिक संबंध तिला घृणास्पद वाटले विकृत पती विरुद्ध पोलीस ठाणे गाठले

जळगाव/क्राईम रिपोर्टर

पाश्चात्य संस्कृतीतून आलेली अश्लीलता आता भारतीय तरुण पिढीच्याही नसानसात भिनायला लागली असून ब्ल्यू फिल्म मधील विकृतीची भुरळ पडलेले काही तरुण आपल्या प्रेयसी किंवा पत्नीकडून तशाच प्रकारच्या सुखाची अपेक्षा करायला लागलेत. जळगावमध्ये एका तरुणाने चक्क आपल्या नवविवाहित पत्नीकडे अप्राकृतिक सहवासाची मागणी केली. इतकेच नव्हे तर पत्नी बरोबरच्या सहवासाची चित्रफीत सुद्धा बनवली आणि ती मित्रांना दाखवण्याची धमकी देऊन तिच्याशी अप्राकृतिक सहवास करण्याचा प्रयत्न केला. मात्र तिने अशा घृणास्पद प्रकाराला नकार देऊन चक्क माहेर गाठले आणि आपल्या पालकांच्या मदतीने विकृत पती विरुद्ध पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवताच पोलिसांनी त्या वासनांध नराधमांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जळगाव एमआयडीसी पोलिस स्टेशन हद्दीत कंगना (काल्पनिक नाव) आपल्या आई वडीलांसह राहते. कंगना विवाहयोग्य झाल्यामुळे तिच्या विवाहासाठी तिच्या आईवडीलांचे प्रयत्न सुरु होते. जळगाव शहरातील अक्षय (काल्पनिक नाव) या तरुणाचे स्थळ तिच्या आईवडिलांना योग्य वाटले. त्यामुळे निवडक ...पान २ वर

## माथेफिरू प्रेमवीरासमोर ती नाही झुकली पण निष्पाप तरुणी अखेर जीवाला मुकली

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर



मयत सुवर्णा

एकतर्फी प्रेम हे सहसा सफल होत नाही आणि जेंव्हा त्यातून नैराश्य येते तेंव्हा माणसाचा स्वतःवर ताबा राहत नाही. आपण जिच्यावर प्रेम करतोय ती आपली होणार नसेल तर इतर कुणाचीही होता नये अशी सुडाची भावना त्या प्रेमवीरांच्या मनात निर्माण होते आणि त्यातून मग जिच्यावर तो प्रेम करीत असतो त्या प्रेमाची जागा सुडाने घेतलेली असते आणि अशा सुडाच्या आगीत अनेक निष्पाप मुलींना आपला जीव गमवावा लागलाय. यवतमाळच्या रामपूर नगर येथे अशाच एका घटनेत एका तरुणीवर प्रेम करणाऱ्या एका तरुणाने तिने लग्नाला नकार देताच चाकूने भोसकून तिची हत्या केली.



आरोपी आकाश

खंडाळा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या रामपूरनगर येथे आकाश आडे २५ वर्षीय तरूण आपल्या कुंटूंबासह राहयला आहे. याच गावातील सुवर्णा चव्हाण या २१ वर्षीय तरूणीवर त्याचे एकतर्फी प्रेम होते. ते दोघे एकाच गावात राहत असल्याने तसे सुरूवातीला त्या दोघांची ओळख होती. त्या ओळखीतून सुवर्णा ही आकाश बरोबर हसत खेळत बोलत होती. याचा अर्थ त्याने वेगळाच काढला होता. सुवर्णा ही आपल्यावर प्रेम करीत आहे,म्हणून ती आपल्याशी मनमोकळेपणाने बोलत असते असे त्याला वाटत होते. आकाश हा गावात राहून कोणताच कामधंदा करीत नव्हता.... पान २ वर

## पैशाचा वाद त्याच्या प्राणावर बेतला तीस रुपयांसाठी मित्रांनी जीव घेतला



मयत अरूण

सांगली/क्राईम रिपोर्टर

मैत्रीत सहसा पैशाचे व्यवहार करू नयेत. कारण पैशावरून वाद होतात आणि वादातून मैत्रीचे रूपांतर दुश्मनीत होते आणि याच दुष्मनीतून एखाद्याचा जीव जातो. त्यामुळे मैत्रीत जर पैशाचा व्यवहार केला, तर तो लवकर मिटवून टाकावा अन्यथा मैत्रीही तुटते आणि प्राणावरही बेतू शकते. सांगली जिल्ह्याच्या मुचंडी गावात असेच घडले. तीन मित्रांमध्ये पैशाच्या व्यवहारावरून अगोदरच वाद होता आणि त्यानंतर अवघ्या ३० रुपयांवरून पुन्हा वादाची ठिणगी पडली आणि दारू पिण्यासाठी निघालेले हे तीन मित्र हमरीतुमरीवर यातील दोघांनी एकाला इतके बेदम मारले कि त्यातच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केलीय आहे.



आरोपी रमेश

सांगली जिल्हयातील जत पासून काही अंतरावर विजापूर रस्त्यावरील हायवेवरती मुंचडी हे गाव आहे. मुंचडी दऱ्याप्पा हे येथील जागृत देवस्थान असून कर्नाटक तसेच महाराष्ट्रातील अनेक भक्त येथे दररोज येत असतात. मुंचडी जवळील तोळबळवाडी हे गाव कर्नाटक सिमेवर लागून असल्याने येथील शेतकऱ्यांना दोन्ही राज्याच्या बाजारपेठेंचा फायदा मिळवता येता. तोळबळवाडी हे गाव सधन शेतकऱ्याचे गाव म्हणून ओळखले जाते. ...पान २ वर

## फुटपाथवरचे प्रेमप्रकरण रक्तात रंगून गेले दारुड्या याराने प्रेयसीलाच ठेचून ठार केले





मुंबई/राजेंद्र वेदांते

बाईने किती जरी ठरवले तरी मुंबई सारख्या शहरात तिला एकटीला राहणे कठीण असते. अशावेळेस तिला पुरुषाचा आधार घ्यावाच लागतो. पण तो पुरुष जर चांगला नसेल तर तिचे जीवन अधिकच हालाकीचे बनते. भायखळा येथे असेच घडले. कुणीही सहारा नसल्याने फुटपाथवर राहणाऱ्या एका महिलेचे तिथल्याच एका इसमाशी सूत जुळले आणि तो तिच्याशी राहू लागला. पण तो दारुडा असल्याने सतत तिच्याकडे दारूसाठी पैसे मागायचा त्यावरून तिला मारझोड करायचा आणि एकेदिवशी त्याने रागाच्या भरात तिची हत्या केली आणि फुटपाथवरच्या या प्रेमकहाणीचा शेवट झाला. मात्र पोलिसांनी अवघ्या १२ तासात आरोपीच्या मुसक्या आवळल्या.



पीआय चिमाजी आढाव

भायखळा पोलिसांचे पथक आपले कर्तव्य चोख बजावत असताना मुंबई पोलीस दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षातून भायखळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेवर प्राणघातक हल्ला झाल्याची माहिती बिनतारी संदेशाद्वारे पोलीसांना प्राप्त झाली. त्यानुसार भायखळा पोलिसांनी तात्काळ मासिना हॉस्पिटल गाठले. हॉस्पिटलच्या बाहेरील फूटपाथवर एक महिला रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. तिच्या डोक्यातून बऱ्याच प्रमाणात रक्तस्त्राव झाला होता. तिच्या जवळच रक्ताने चिंब भिजलेला एक दगड पडला होता. ती महिला रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध अवस्थेत पडली होती. ...पान २ वर



आरोपी यादव

## माथेफिरू बाप असा कसा हैवान झाला तीन हजारांसाठी त्याने मुलाचा खून केला



मयत महंम्मद सलिम

शेगाव/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही गोष्टीवरून चिडणार माणूस कधीही कोणाचा घात करू शकतो. अशा माणसाला कधी कधी रक्ताच्या नात्याचीही ओळख राहत नाही. कारण त्याला जे हवे असते ते मिळाले नाही कि त्याच्या अंगात सैतान संचारतो आणि मग रागाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. शेगाव येथे घडलेल्या अशाच एका घटनेत घरात मुलीच्या लग्नाची गडबड सुरु असतानाच त्यात बापानेच विघ्न आणले आणि अवघ्या तीन हजार रुपयांसाठी त्याने पोटच्या पोराची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बापाला अटक केली आहे.



आरोपी शेख कासम

शेख कासम शेख गफुर याचा स्वभाव खुनशी होता. त्याला जे हवे असायचे ते कुठल्याही परिस्थीत आपल्याला मिळावे यासाठी तो कुठल्याही थराला जात असे. त्याच्या स्वभावामुळे त्याला घरात व समाजात कोणत्याही प्रकारचे स्थान नव्हते. त्याच्या मुलीचे लग्न ठरले असतांना देखील त्याला घरात कुणी विचारत नव्हते. शेख कासम याचा मुलगा मोहंमद सलीम हा मौलाना होता. त्याला समाजात चांगले स्थान होते. तो गेल्या काही



दिवसापासून रमजान महिन्याची तरावीची नमाज पठण करण्यासाठी सैलानी येथे गेला होता. १७ मे रोजी घरात मोहंमद सलीम याच्या बहिणीचे लग्न होते. घरातील सर्व सदस्य लग्नाच्या तयारीत लागले होते. सैलानी येथून नमाज पठण करुन आल्यावर मौलाना मोहंमद सलीम हा देखील बहिणीच्या लग्नाच्या तयारीला लागला होता. मात्र घरातील कर्ता पुरुष म्हणवला जाणारा शेख कासम हा सर्वांना जणू काही अडसर होता. तो त्याचा ...पान २ वर

CMYK

24 TO 30 MAY 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 22/05/2021 7:00 PM Page 1



पान १ वरून....

## संचारबंदी, लॉकडाऊन सरकारची सुरू...

तरी टेस्ट करून घ्यायला तयार नाहीत. कारण टेस्ट केली आणि आपण पॉझिटीव्ह निघालो तर हॉस्पिटलमध्ये ॲडमीट व्हावे लागेल आणि हॉस्पिटलमध्ये रोजच्या रोज मरणाऱ्या कोरोना रुग्णांची संख्या पाहता आपलाही तिथे मृत्यू होईल अशी लोकांना भीती वाटत आहे. त्यामुळे लोक आजार अंगावर काढीत आहेत आणि अशाप्रकारे अंगावर आजार काढणारे अनेक लोक कोरोना बाधित आहेत. मेडिकल मधल्या थातुर मातुर सर्दी तापाच्या गोळ्या घेऊन आपली रोजची कामे करीत आहेत. रस्त्यावर फिरत आहेत. बाजारात जात आहेत. कुटुंबातील लोकांमध्ये नेहमीप्रमाणे राहत आहेत. अशा स्थितीत जर ऐकाला कोरोना असेल तर त्याच्यामुळे संपूर्ण कुटुंब कोरोनाबाधित होत आहे आणि हि माणसे रस्त्यावर उतरल्याने त्यांच्यामुळे इतरांना कोरोनाची लागण होत आहे. अशा तऱ्हेने आजार लपवल्यामुळेच कोरोनाचा सर्वाधिक प्रादुर्भाव वाढत आहे. तेंव्हा सरकारने कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊन करण्याऐवजी घरोघरी जाऊन प्रत्येक कुटुंबातील लोकांची कोरोना चाचणी केल्यास त्यातून शेकडो कोरोनाबाधित आयडेंटिफाय होतील आणि अशा लोकांना रुग्णालयात नेवून त्यांच्यावर उपचार केल्यास त्यांच्यापासून इतरांना कोरोना होण्याचा धोका टळेल. म्हणूनच सर्दी, ताप, खोकला यासारखे कोरोनाची लक्षणे असलेले आजार लोकांनी लपवून स्वतःचा आणि इतरांचाही जीव धोक्यात घालू नये आणि जे कुणी असे करतील त्यांचा सरकारने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. कारण सांगलीत एका इसमाच्या कुटुंबाने त्यांच्या कुटुंबातील एकाला कोरोना झाल्याचे लपवल्यामुळे त्याच्या दुसऱ्या नातेवाईकाचे संपूर्ण कुटुंब कोरोनाबाधित झाले आणि त्यातील तिघांचा मृत्यू झाला. मिरज तालुक्यातील टाकली गावात राहणारे बाहुबली पाटील यांची आई एका आजारी नातेवाईकाची विचारपूस करायला दुसऱ्या गावात गेल्या होत्या. पण जो आजारी इसम होता त्याला कोरोना झाला होता आणि हि गोष्ट त्याच्या नातेवाईकांनी बाहुबली पाटील यांच्या आईपासून लपवून ठेवली. त्यामुळे ती बिचारी त्याची विचारपूस करण्यासाठी त्याच्या जवळ गेली, त्याच्याशी तिने बातचीत केली. त्याचा परिणाम असा झाला तिलाही कोरोनाची बाधा झाली आणि ती जेंव्हा घरी आली तेंव्हा तिच्यामुळे बाहुबली पाटील त्यांची पत्नी दोन, काका आणि चुलत भाऊ अशा संपूर्ण कुटुंबालाच कोरोनाची बाधा झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे बाहुबली पाटील त्यांचे काका आणि बाहुबलीची आई अशा तिघांचा मृत्यू झाला असून इतरांवर उपचार सुरु आहेत. सध्या सांगली जिल्ह्यात १ लाख ६ हजार ९४५ कोरोनाबाधित असून आतापर्यंत ४ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झालाय. एका माणसाने त्याला झालेला आजार त्याच्या नातेवाईकाचे संपूर्ण कुटुंब कोरोनाच्या विळख्यात सापडले आणि तिघांचा मृत्यू झाला. म्हणूनच लोकांनी आजार लपवू नये. कोरोनाची लक्षणे असलेल्यांची कोरोना चाचणी करून घ्यावी. कारण एकामुळे अनेकजण कोरोना बाधित होऊन मृत्युमुखी पडत आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढण्याचे हेच प्रमुख कारण आहे. कारण लोक आजार लपवत आहेत. टेस्ट करून घ्यायला घाबरत आहेत आणि खाजगी डॉक्टरांकडे असे रुग्ण गेले तर त्यांना कोरोना टेस्ट करून घेण्याचा सल्ला देण्याऐवजी खाजगी डॉक्टर थातुर मातुर औषधे देऊन स्वतःचे खिसे भरत आहेत. तेंव्हा सरकारने याकडे लक्ष देऊन आता घरोघरी जाऊन कोरोना टेस्ट करणारी यंत्रणा उभारावी, तरच कोरोनाचा प्रादुर्भाव रोखता येईल आणि लोकांनीही आता आपली जबादारी ओळखून आजार अंगावर काढू नये कोरोना टेस्ट करून घ्यावी.

## सातबाऱ्यावरून त्याने वाहिनीचे नाव...

थरकाप देखील उडाला. योगिता मुकेश सोनार (४०) असे कुऱ्हाडीच्या घावात हत्या झालेल्या महिलेचे नाव असून दिपक लोटन सोनार असे खून करणाऱ्या तिच्या दिराचे नाव आहे. योगिता मुकेश सोनार या महिलेच्या पतीचे गेल्या काही महिन्यापुर्वी अपघाती निधन झाले आहे. पतीच्या अपघाती निधनामुळे योगिता सोनार ही महिला जणूकाही एकाकी पडली होती. तिच्यावर मुलाच्या शिक्षणाची व पालनपोषणाची जबाबदारी आली होती. पतीच्या निधनानंतर घरातील तिचा दिर, सासु यांनी जणू काही तिचे जगणे कठीण केले होते. घरातील मालमत्तेचा वाद तिच्यासोबत नेहमीच घातला जात होता. तिच्यावर अपघाती विमा काढण्यासाठी नेहमीच दबाव टाकला जात होता असा देखील एक आरोप आता होऊ लागला आहे. तुझ्या पतीचे निधन झाले असून तु आता घरातून निघून जा असे तिला वारंवार बजावण्यात येत असल्याची बाब आता या घटनेनंतर उघडपणे नातेवाईक बोलत आहेत. पतीच्या निधनानंतर सात बारा उताऱ्यावर आपले नाव लावले का? अशी योगिताने तिच्या दिराला विचारणा २१ मेच्या रात्री केली. त्यामुळे वादाला तोंड फुटले. या विषयावरुन संतापलेला दिर दिपक सोनार याने घरातील कुऱ्हाड हातात घेत त्याची वहिनी योगितावर हल्ला केला. आता आपल्यावर कुऱ्हाडीचे वार होणार याचा अंदाज आल्यामुळे जिव वाचवण्यासाठी योगिताने घराबाहेर पळण्याचा प्रयत्न केला. मात्र तिचा जिव वाचवण्याचा प्रयत्न नराधम दिपकने हाणून पाडला. त्याने पाठीमागून तिच्यावर कुऱ्हाडीने अतिशय निघृण हल्ला केला. या हल्ल्यात योगीता थेट यमसदनी गेली. घरात रक्ताचा जणू काही सडा पडला. रक्ताचे शिंतोडे घरात व घराच्या दारावर उडाले एवढा हा हल्ला कृर पद्धतीचा होता. योगीताचा खून होत असल्याचे बघून तिचा मुलगा आर्यन भेदरला. काय करावे हे त्याला सुचत नव्हते. मात्र तो या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे. त्यान आपल्या काकाला आपल्या आईचा खून करतांना पाहिले आहे. या घटनेची माहीती मिळताच रामानंद नगर पोलिस स्टेशनचे पो.नि. अनिल बडगुजर व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दिपक यास त्याच्या हातातील कु-हाडीसह ताब्यात घेतले. योगिताचा पाच जणांनी खून केला असल्याचे तो बडबड करत होता. घरातील तिची सासू, नणंद व दिर आदींनी संगनमताने परस्पर तलाठ्यास हाताशी धरुन सात बारा उताऱ्यावर आपआपली नावे लाऊन घेतली असल्याचा देखील मयत योगिताच्या काकूने केला आहे. तसेच खून झाला त्यावेळी तिच्या सासूने केवळ बघ्याची भुमीका घेतली होती. तिचा छळ करणाऱ्यांमधे तिच्या नणंदेचे देखील नाव काकूने घेतले आहे. योगिताच्या ताब्यातील सोने या नराधम लोकांनी गायब केले असल्याचा आरोप मयत योगीताच्या काकूने प्रसार माध्यमांसोबत बोलतांना केला. या घटनेत योगिताचे नाव हेतूपुरस्सर सात बारा उताऱ्यावर न लावणाऱ्या तलाठीवर देखील गुन्हा दाखल केला जावा असा आरोप केला जात आहे. या घटनेप्रकरणी रामानंद नगर पोलिस स्टेशनला दिपक सोनार याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

## अप्राकृतिक संबंध तिला घृणास्पद वाटले...

नातेवाईकांच्या मदतीने दोन्ही पक्षाकडून कंगनाच्या विवाहाची बोलणी करण्यात आली. बोलणी यशस्वी झाल्यानंतर लवकरच तिचा विवाह जळगाव शहरातील अक्षयसोबत करण्याचे निश्चित झाले. १९ फेब्रुवारी रोजी कंगनाचा विवाह अक्षयसोबत तिच्या माहेरी उत्साहात झाला. २३ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या वेळी नवविवाहीत कंगना व अक्षय या दोघांना प्रथमच शयनकक्षात प्रणयाची संधी मिळाली. पोर्न फिल्ममधे दाखवतात त्याप्रमाणे प्रणय नव्हे तर धसमुसळेपणा करण्याची अक्षय यास घाई झाली होती. पत्नी कंगनासोबतचा शयनकक्षातील अगतिक क्षण मोबाईलमधे शुट करण्यासाठी देखील त्याने तयारी केली. त्या पद्धतीने त्याने त्याचा मोबाईल कॅमेरा सेट केला. त्याने पत्नी कंगनासोबत अमानवी पद्धतीने मिलनाचे कृत्य करण्याची इच्छा व्यक्त केली व तसे कृत्य करण्यास बळजबरीने सुरुवात देखील केली. या गैरप्रकाराचा त्रास होऊ लागल्यामुळे कंगनाने तसे कृत्य करण्यास अक्षयला नकार दिला. तिचा नकार मिळताच त्याने तिला मारहाण करण्यास सुरुवात केली. मी तुझ्यासोबत केलेल्या या प्रसंगाची व्हिडीओ शुटींग केली आहे. तु जर मला माझ्या मनाप्रमाणे तशा प्रकारचे कृत्य करु दिले नाही तर मी या क्लिपचे प्रदर्शन माझ्या मित्रांकडे करेन व तुझी बदनामी करेन अशी त्याने तिला धमकी दिली. मोबाईलमधे शुट केलेला प्रसंग मित्रांना दाखवण्याची धमकी देत तिच्या इच्छेविरुद्ध त्याने तिच्यासोबत पोर्न फिल्ममधे दाखवतात त्याप्रमाणे कर्म केले व तिला देखील स्वत:च्या मनाप्रमाणे तसे कृत्य करण्यास भाग पाडले. तिने विरोध केला असता त्याने तिला मारहाण करत तिच्यासोबत बळजबरी केली. त्यानंतर हा प्रकार नेहमीच होऊ लागला. रोज रात्री या प्रसंगाची मोबाईल शुटींग करत तो तिच्यासोबत अनैसर्गीक कृत्य करु लागला. त्याच्या या नेहमीच्या प्रकाराला कंगना वैतागली. तिला वेदना असह्य होऊ लागल्या. अखेर ४ एप्रिल रोजी ती तिच्या माहेरी निघून आली. माहेरी आल्यानंतर तिने हा प्रकार तिच्या आईजवळ कथन केला. आपल्या जावयाला अद्दल घडवण्यासाठी तिने मुलगी कंगनाला धिर देत पोलिस स्टेशनला जाण्याचा सल्ला दिला. विचाराअंती आपल्या आईसोबत कंगनाने १४ मे रोजी जळगाव शहर पोलिस स्टेशन गाठले. आपल्यावर गुदरलेला प्रसंग तिने पोलिस स्टेशन अधिकाऱ्यांसमक्ष कथन केला. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार तिच्या पतीविरुद्ध रितसर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

## पैशाचा वाद त्याच्या प्राणावर बेतला...

शामू गुंडू मलमे हे आपल्या पत्नी मुलासह येथे राहयाला आहेत. त्याचा मुलगा अरूण मलमे हा त्याचेबरोबर शेतीची कामे करत असतो. त्याची गावातीलच सुधीर बिराप्पा पाटोळे व रमेश फकिराप्पा पाटोळे याच्या बरोबर घनिष्ट मैत्री होती. हे तिघेही कायम बरोबर राहत होते. मैत्रीच्या नात्यातून त्याच्यात नेहमी देण्या घेण्याचा व्यवहार ही होत होता. तर कधी रंगीन पार्टी ही हे तिघेजण करीत होते. मैत्री असल्यामुळे ते तिघेही नेहमीज एकमेकांच्या सानिध्यात राहत होते.त्याचेत कोणत्याही गोष्टीचा कधीच आतापर्यंत आडपडदा नव्हता. कायम हे तिघे ही पार्टी करण्यासाठी एकत्र येत होते. मागच्या काही दिवसात त्याचेत पार्टी झाली असताना काही कारणावरून पैशाच्या देण्या घेण्यावरून रमेश पाटोळे आणि अरूण मलमे याचेत वाद झाला होता. त्यावेळी अरूण याने रमेशकडे काही पैसे मागितले असता रमेशने ते पैसे लागलीच अरूणला दिले होते. परंतू त्यावेळी दिलेले पैसे अरूण हा रमेशला वेळेत काही परत करू शकला नाही याचा राग रमेश याला होता. तो काही तरी निमित्य काढून अरूणकडे ते पैसे परत मागत होता. पण अरूण हा त्याला आज देतो उदया देतो असे करीत होता. मी काय पळून जातो काय अशी विचारणा तो रमेश याच्याकडे करीत होता. रमेश याने दिलेली रक्कम ही फार काही मोठी नव्हती.शंभर दोनशे रूपयाच्या आतील ती रक्कम होती.अरूणला ती सहज परत देणे शक्य होते. परंतु तरीही तो जाणीव पूर्वक पैसे देण्यास टाळाटाळ करीत होता. याला कारण ही तसेच होते. रमेशने अरूण हा आपले घेतलेले पैसे परत देत नाही असे गावभर केले होते.ही गोष्ट त्याने आपल्या भावकीतील अंकुश हणमंत पाटोळे याला देखिल सांगितलेली होती. कारण अंकुश याची काही रक्कम हा रमेश पाटोळे हा देणे लागत होता. खरे तर हा मैत्रीतील त्याचा व्यवहार होता. पण रमेश हा मुद्दामच आपली गावात बेईज्जत करीत आहे म्हणून अरूणने रमेश याचेकडून घेतलेली रक्कम त्याची त्याला परत दिलेली होती. त्याने घेतलेली रक्कम परत दिली असली तरी मागील भांडणाचा राग रमेश पाटोळे, सुधीर पाटोळे आणि अंकुश पाटोळे यांना होता.ते तिघे ही अरूण मलमे याच्यावर डाव धरून होते. त्याला अद्दल ही घडविलीच पाहिजे असे त्याचे मत होते. कारण अरूण हा गावात मिजाशी जास्त मारत असतो. याचा त्यांना राग येत होता. घरमे नही दाना आणि मला आण्णा म्हणा अशी त्याची गत होती. मंगळवार दि.१८ मे रोजी रमेश पाटाळे आणि सुधीर पाटोळे यांना पार्टी करण्याची हुक्की आली होती. सध्या राज्यात लॉकडाऊन चालू असले तरी चोरून क्वार्टर मिळते हे त्यांना माहित होते. गावाच्या बाहेर जावून मस्तपैकी पार्टी करण्याचा बेत त्यांनी आखला होता.त्यासाठी ते सकाळी १० वाजणेच्या सुमारास अरूण मलमे याच्या घराकडे गेले. त्याला ही आज आपण तिघेजण मिळून नेहमी सारखी पार्टी करूया असे सांगितले. ते दोघेही त्याला बोलवायला आल्यावर त्याने ही आपली दुचाकी गाडी बाहेर काढली ते तिघे ही त्याच्या गाडीवर बसून सकाळीच बाहेर पडले. दिवसभर दारूची पार्टी करून ते तिघे ही झिंगत परत संध्याकाळच्या सुमारास गावात परत आले. त्या तिघांना ही नशा जास्तच झाली होती. सकाळपासून दारू पिल्याने अंगात शिरशिरी तर होतीच परंतु या सगळ्या भानगडीत अरूण याने पार्टी करत असताना दारूला पैसे कमी पडले म्हणून रमेश याला तीस रूपये उसणे दिले. गावात गेल्यावर रमेश याने त्याला तीस रूपये परत देतो असे सांगितले होते. संध्याकाळच्या सुमारास ते तिघे ही अरूणच्या गाडीवरून गावातील कन्नड शाळेजवळ आले. घरी परत जात असताना अरूण याने रमेशकडे दिलेले तीस रूपये परत मागितले होते.त्यावेळी रमेशकडे तीस रूपये नव्हते. या कारणातून तेथे रमेश आणि अरूण याचेत वाद आणि भांडणाला सुरूवात झाली. ते तिघेही एकमेकांना अर्वाच्च भाषेत शिव्या देत होते भांडणात अरूण जास्तच आक्रमक होत रमेशकडे माझे मला तीस रूपये परत दे म्हणून मागे लागला होता. याचा राग रमेश याला आला. त्यावेळी तेथेच जवळच्या पानटपरीवर उभ्या असलेल्या आपल्या भावकीतील अंकुश पाटोळे याचेकडे रमेश याने तीस रूपये उसणे मागितले. त्या तिघांचे भांडण तो बघत होता. ते तिघेही जास्त दारू प्यायलेले आहेत याची माहिती त्याला होती. तरीही त्याने नशेत असलेल्या रमेशकडे त्याने तुला कशासाठी तीस रूपये पाहिजेत अशी विचारणा केली. त्यावर रमेश याने अरुणकडे बोट दाखवून याला मी तीस रूपये देणे लागतो आहे.मला तीस रूपये दे. असे तो अंकुश याला म्हणाला.त्यावेळी ते तिघेही दारू प्यायलेले असल्याने अंकुश याने रमेश याला तीस रूपये देण्यास नकार दिला. या कारणातून दारुच्या नशेत असलेल्या अरूण याने रमेश याच्या जातीवर जात बघ, तुला तुझ्या भावकीतील लोक तीस रूपये देवू शकत नाहीत आणि मी घेतलेले पैसे तू लागलीच माझ्याकडे मागून गावात माझी इज्जत काढली होतीस. अरूण याने जात काढल्याने अंकुश याला राग आला त्याने रमेश याला बाजुला ढकलत अरूण याच्या अंगावर मारहाण करायला धावला. त्याला गाडीवरून ओढून तो त्याला मारहाण करीत असताना रमेश आणि सुधीर ही अरूण याला मारायला त्याच्या अगांवर धावून गेले होते. त्या तिघांनी त्याला गाडीवरून खाली ओढून लाथाबुक्कांनी मारहाण करायला सुरवात केली. तर त्याच मारहाणीत रमेश याने अरूण याचा जोरात गळा आवळून धरला. तसा तो तडफडू लागला. आधीच त्याला त्या तिघांनी जबर मारहाण केल्याने त्याच्या नाका तोंडातून रक्त येत होते. त्यात रमेश याने गळा आवळून धरल्याने अरूणचा जीव घुटमळू लागला होता. अरुण याला मारहाण होत असताना गावातील काही लोकांनी त्याला त्या तिघांच्या तावडीतून सोडविण्याचा प्रयत्न केल्यावर ते तिघे ही घटनास्थळावरून पळून गेले. अरूणला त्याच्या मित्रांनी जबर मारहाण केल्याची माहिती जवळच्या लोकांनी त्याच्या घरच्या लोकांना दिली होती. त्यावेळी अरूण याचे आई वडिल भाऊ हे घटनास्थळी धावून आले. त्यांनी जखमी अरूण याला तातडीने लागलीच एका गाडीत घालून जत येथील ग्रामीण सरकारी रुग्णालयात उपचारासाठी नेले. परंतू तेथील उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती त्याच्या नातेवाईकांना दिली. अरूणला त्याच्या मित्रांनी केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच मयत अरूणचे वडिल शामू गुंडू मलमे यांनी या घटनेची माहिती जत पोलीस स्टेशनला दिली.जत पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा करून ग्रामीण रूग्णालयातून डॉक्टराकडून अरूणचा पोस्ट मार्टम रिपोर्ट मागवून घेऊन ग्रामीण रुग्णालयातच त्याचे शवविच्छेदन केले. पोस्ट मार्टम रिपोर्ट मध्ये मयताचा गळा आवळ्याने श्वास कोडून मृत्यू अशी नोंद केलेली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवार दि. १९ व २० मे रोजी पर्यत पोलीस या घटनेतील संशयीत पळून गेलेल्या तिन्ही आरोपीचा शोध घेत होते. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना ही घटना कुणी आणि कोणत्या कारणातून केली होती याची माहिती त्यांना मिळालेली होती. दोन दिवसाच्या अथक प्रयत्नानंतर या घटनेतील तिन्ही आरोपी पोलीसांच्या गळाला लागलेले होते. पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची चौकशी केली असता.पोलीसासमोर या तिघांनी ही आपला गुन्हा कबूल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.मयत अरूण मलमे यांचे वडिल शामू गुंडू मलमे (वय ५८) रा.तोळबळवाडी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी अरूण शामू मलमे (वय २४) याच्या खुन प्रकरणी रमेश फकिराप्पा पाटोळे (वय २५) सुधीर बिराप्पा पाटोळे (वय २१) आणि अंकुश हणंमत पाटोळे(वय २६) याचे विरोधात जत पोलीस ठाण्यात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना जत येथील मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याना चार दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास जत पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. किरकोळ आणि क्षुल्लक कारणावरून हल्लीची तरूण पिढी आक्रमक होऊन समोरच्याला जशास तसे उत्तर देत असते. अंगात गरम रक्त असल्याने त्याचा पारा लगेच चढत असतो. त्यातच नशे की बात खिसे म्हणत पुढचे पुढे बघुया असे मनात ठरवून समोरच्याची बरोबर गेम केली जाते हेच या घटनेवरून दिसून येते.अरूण मलमे याच्या खूनाला केवळ तीस रूपयाचे कारण होते की अन्य कोणते कारण आहे याचा तपास ही पोलीस करीत आहेत.परंतू संशयीत आरोपीनी दिलेले तीस रूपय आणि जातीवरून अरूण याने शिवीगाळ केल्याने आपला हेतू केवळ त्याला मारहाण करण्याचा होता. त्याला मारून टाकण्याचा नव्हता अशी कबुली पोलीससमोर दिली आहे. म्हणूनच व्यसनाधिनता आणि मित्राची मैत्री ही घराच्या उंबऱ्याच्या बाहेर ठेवून मैत्रीत व्यवहार आणू नये नाही तर मैत्रीत व्यवहार आणल्यास त्यातून अशा घटना घडतात हेच खरे आहे.

## फुटपाथवरचे प्रेमप्रकारण रक्तात रंगून...

तिच्यावर कुणी अज्ञात आरोपीने प्राणघातक हल्ला केला होता. हे पोलीसांना समजण्यास वेळ लागला नाही. अशावेळी त्या महिलेला तात्काळ वैद्यकीय उपचाराची गरज असल्याने पोलीसांनी तिला त्याच अवस्थेत नजिकच्या जे जे रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टररांनी तिला तपासून मृत घोषित केले. दरम्यान भायखळा पोलीसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपी विरूद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला. (गु. र. क्र. ३१९/२०२१) भादंवि कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल केला. त्या महिलेचा खून झाल्याने पोलीसांची जबाबदारी आता वाढली होती.ती महिला कोण? कुठली? इथे कशी आली? हा सर्व तपासाचा भाग तपास पथकाच्या समोर होता. या महिलेवर जीवघेणा हल्ला करणारा मारेकरी कोण? या तपासात पोलीस अधिकारी गुंतले होते. सुरवातीला पोलिसांना वाटले की हे घरगुती प्रकरण असावे का? म्हणून त्या अनुशंगाने तपासाला सुरुवात झाली होती. तेंव्हा पोलिसांना समजले की, हि महिला रस्त्यावर राहून दिवस काढणारी आहे. तिच्या नातेवाईकांचा पत्ता नसून एक व्यक्ती तिच्यासोबत जबरदस्तीने राहत होता. तो दारू पिण्यासाठी तिच्याकडे सतत पैशाची मागणी करीत होता. पैसे न दिल्यास तो तिला जबर माराहाण करीत होता. या दोघांचे अनैतिक संबंध असल्याचेही पोलिसांना संशय आहे. तसेच या महिलेची हत्या करणारा आरोपी हा या महिलेवर संशय ही घेत होता. या दोघांमध्ये नेहमी शाब्दिक बाचाबाची होत होती अशी माहिती पोलीस पथकाला मिळाल्यानंतर आणि संशयीत आरोपीचे वर्णन मिळाल्यानंतर पोलिसांनी त्या आरोपीचा कसून शोध सुरू केला. पोलीसांची विविध पथकांनी भायखळा तसेच आजूबाजूचा भाग पिंजून काढण्यास सुरुवात केली. सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना गुन्ह्याचा घटनास्थाळी कोणतेही सीसीटीव्ही फुटेज अथवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हता. यामुळेच अशा स्थितीत पोलिसांनी तपास करणे अवघड असते. परंतू गुन्ह्याचा तपास करण्याची कसब तसेच भक्कम अनुभव असलेल्या या पथकाने या तपासाला सुरुवात केली होती. पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव यांचा तर दांडगा अनुभव पाठीशी असल्यामुळे कोणताही आरोपी त्याच्या रडारवरून सुटत नाही. म्हणून चिमाजी आढाव हे बरेच वर्ष गुन्हे अन्वेषण शाखेत कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून परीचयाचे आहेत. त्यांच्या तपासातला आरोपी कधीही मोकाटपणे फिरू शकत नाही. हे सर्वसुत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा तपास सुरू होता. तपासादरम्यान आरोपी उत्तर प्रदेशातील मूळगावी पळून जाण्याच्या तयारीत असल्याचे पोलिसांना समजले. त्यानुसार सापळा लावून पोलिसांनी आरोपी त्याच्या मूळ गावी उत्तर प्रदेश येथे पळून जाण्याचा तयारीत असताना भायखळा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाने आरोपी संतोष राम किशोर यादव याला ताब्यात घेतले. आरोपीची कसून चौकशी केली असता त्याने रागाच्या भरात महिलेचा खून केल्याची कबुली दिली. आरोपी हा रोडसाईड असून त्याचा मुंबईतील कोणताही कायमचा रहिवासी पत्ता नसल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे. हा खूनाचा गुन्हा घडल्यानंतर भायखळा पोलिसांनी अवघ्या १२ तासातच आरोपीचा शोध घेऊन त्याच्या मुसक्या आवळून त्यास अटक केली. आरोपी हा शिघ्रकोपी असल्याने त्याने या महिलेच्या डोक्यात दगड घालून तिची हत्या केली. असे पोलीस सुत्रांचे म्हणणे आहे. सदर गुन्ह्याची उकल सहाय्यक पोलीस आयुक्त पवार, भायखळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक खोत, पोलीस निरीक्षक (गुन्हे) चिमाजी आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक मांजरेकर, पोलीस उपनिरीक्षक रूपेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय जाधव, वाडिले, पाटील, तोडसे, कलदागी, सावंत, बोरसे, दिवटे, ठाकूर, साळुंखे, उचले आदी पथकाने केली.

## माथेफिरू बाप असा कसा हैवान झाला...

खुनशी स्वभाव बदलण्यास तयार नव्हता. त्यामुळे तो घरातील कर्ता असून देखील सर्वजण त्याच्यापासून चार हात लांब राहणे योग्य समजत होते. घरात मुलीचे लग्न जवळ आले असतांना देखील शेख कासम याने घरात एक विघ्न आणले होते. मौलाना असलेल्या आपल्या मुलाजवळ तो गेल्या काही दिवसांपासून तिन हजार रुपयांची मागणी करत होता. मोहंमद सलिम हा बापाची तिन हजार रुपयांची मागणी पुर्ण करु शकत नव्हता. त्याने तसे स्पष्टपणे बापाला नकार दिला होता. तरीदेखील त्याची मोहंमद सलीमकडे तिन हजार रुपयांची मागणी सुरुच होती. तब्बल एक महिन्याच्या कालावधीनंतर मोहंमद सलीम हा सैलानी येथून नमाज पठण करुन घरी परत आला होता. त्याला आपल्या बहिणीच्या लग्नाची काळजी होती. बाप शेख कासम आपल्याला तीन हजार रुपयांसाठी आज पुन्हा त्रास देईल हे लक्षात घेत मोहंमद सलीम त्याच्यापासून चार हात लांब रहात होता. रात्रीच्या वेळी मोहंमद सलीम हा गुपचूप गरिब नवाज मशिदीत लपून बसला. मात्र त्याच्या प्रत्येक हालचालीवर त्याच्या बापाची नजर होती. तो त्याच्या मागावरच होता. तीन हजार रुपये मिळत नसल्यामुळे तो रात्रीच मोहंमद सलीम याचा मागोवा घेत मशीदीत गेला. त्याठिकाणी त्याने पुन्हा मुलाला तीन हजार रुपयांची मागणी सुरु केली. या झटापटीत मुलाचा नकार ऐकल्यानंतर संतापलेल्या शेख कासम याने जवळच पडलेल्या माईकच्या वायरने मोहंमद सलीम याचा गळा आवळला. गळ्याला माईकच्या वायरचा फास करकचून आवळला जाऊ लागला. त्यामुळे मोहंमद सलीम काही वेळातच गत:प्राण झाला. तो अल्लाला प्यारा झाला. १६ मे रोजी सकाळी पाच वाजेच्या सुमारास अजान देण्यासाठी सबद वली सय्यद मेहबुब गेले. त्यावेळी त्यांना मोहंमद सलीम हा झोपलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यांनी त्याला उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र तो काही केल्या उठत नव्हता. त्याचा श्वासोश्वास देखील बंद पडल्याचे त्यांना आढळून आले. इतर नागरिकांच्या मदतीने सबद वली यांनी त्याला उठवण्याचा पुन्हा प्रयत्न केला. तो मयत झाला असल्याचे सर्वांच्या लक्षात आले. त्याच्या मृतदेहाचे बारकाईने निरीक्षण केले असता त्याच्या गळ्यावर आवळल्याचे व्रण दिसून आले. या घटनेची माहिती तातडीने शेगाव शहर पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच शेगाव शहर पोलिस स्टेशनचे पो.नि. सतोष टाले व त्यांचे सहकारी पोलिस उप निरीक्षक नितिन इंगोले व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळ गाठले. या घटनेची माहिती गावात व परिसरात वाऱ्यासारखी पसरण्यास वेळ लागला नाही. त्यामुळे गावातील नागरिकांनी परिसरात तोबा गर्दी केली. पोलिस पथकाने मोहंमद सलीम याचा मृतदेह पंचनामा झाल्यानंतर उत्तरीय तपासणीकामी रुग्णालयात रवाना केला. या घटनेप्रकरणी मयत मोहंमद सलीम याच्या आईने शहर पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार तिचा पती व संशयीत आरोपी शेख कासम शेख गफुर याच्या विरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. संशयीत शेख कासम हा घटना घडल्यापासून फरार झाला होता. त्याच्या घरात दुसऱ्याच दिवशी १७ मे रोजी मुलीचे लग्न होते. या घटनेमुळे लग्नात बाधा आली. गुन्हा दाखल होत असतांनाच पो.नि. संतोष टाले यांनी आपल्या सहकाऱ्यांना फरार शेख कासम याच्या मागावर रवाना केले होते. फरार शेख कासम हा बाळापुर येथे असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्याला जेरबंद करण्यात आले. रागीट व खुनशी स्वभाव असलेला शेख कासम याने एप्रिल महिन्यात घरात वाद घातला होता. यावेळी त्याने घरातील सदस्यांच्या हातावर ब्लेडने वार केले होते. आता तो मुलाकडे तिन हजारासाठी तगादा लावत होता. या तगाद्यातूनच त्याच्या हातून मुलाचा खून झाला. घटनेच्या वेळी तो मुलाच्या छातीवर बसला व त्याने माईकच्या वायरने त्याचा गळा आवळला. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने सुरुवातीला त्याला पोलिस कोठडी सुनावली. या गुन्ह्याचा पुढील तपास पो.नि. संतोष टाले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## माथेफिरू प्रेमवीरासमोर ती नाही...

सुवर्णाचे शिक्षण हे दहावी पर्यंतचे गावतच झाले होते. त्यानंतर पसुद येथे बारावीचे शिक्षण घेऊन पुढे डीएडची पदवी मिळविलेली होती. सुवर्णाच्या घरची परिस्थिती ही तशी बेताचीच असल्याने चांगले शिक्षण घेऊन आपण करियर करावे असे तिने मनातून ठरविले होते. त्यामुळे कुणावर प्रेम करावे किंवा कुणाच्या प्रेमात पडावे असे तिला जराही वाटत नव्हते. तिला परिस्थिची जाणीव होती. घरी आई-वडिल आणि भाऊ हे शेतात राबत होते. त्याच्या कष्टाचे चीज व्हावे म्हणून तिने डीएडची पदवी घेतली होती. तर इकडे आकाश मात्र खुशाल चेंडू सारखा वागत होता. त्याचे शिक्षण हे दहावी पर्यतच झाले होते. त्याचे आई वडिल ही रोजंदारीवरच दुसऱ्याच्या शेतात काम करीत होते. त्याच्या घरची परिस्थीती ही बेताचीच होती. पण तारूण्य सुलभ भावनेने तो सुवर्णाच्या प्रेमात पडला होता. तिला आपलेसे करण्यासाठी धडपडत होता. तो ती भेटली की तिच्याशी मुद्दामच गप्पा मारत होता. तर कधी तिला भेटायला मुद्दामच तिच्या घरी जात होता. ती ही तो आपल्या शेजारी राहत असल्याने त्याच्याशी मनमोकळेपणाने बोलत होती. तिच्या मनात तिच्याविषयी काहींच नव्हते. चांगले शिक्षण घेऊन आपण आपल्या पायावर उभे राहून आई वडिलांचे नाव काढावे असे होते. तो तिला बोलत असताना किती ही लाडी गोडी लावीत असला तरी ती त्याला भुलत नव्हती. किंबहूना आकाशचे आपल्यावर प्रेम आहे याची तिला काही कल्पना ही नव्हती. तरी ही आकाशने बोलता बोलता माझे तुझ्यावर प्रेम आहे असे सुचकतेने बोलला होता. पण तिने त्याकडे डोळे झाक करीत तू काही तरी कामधंदा कर. मग कुणाच्या तरी प्रेमात पड असा सल्ला दिला होता. पण तो तिच्या प्रेमात इतका पागल झाला होता की त्याला तिच्याशिवाय दुसरे काहीच दिसत नव्हते.तो तिला रात्र आणि दिवस स्वप्नात बघत होता. काहीही करून तिला गढवायचेच असे त्याने मनाशी ठरविले होते. म्हणून तो सारखा तिच्या मागे लागून तिला आपल्या मनातील सांगत होता. ती काही त्याचे मनावर घेत नव्हती. याचा त्याला राग आलेला होता. आपण तिच्यावर मनापासून प्रेम करून ही ती आपल्याला रिस्पॉन्स देत नाही म्हणजे तिचे दुसऱ्या कुठल्यातरी तरूणावर प्रेम असले पाहिजे म्हणून ती आपल्याला नकार देत आहे असा समज त्याने करून घेतलेला होता. ती काही आपल्याला रिस्पॉन्स देत नाही, आपल्याशी पहिल्यासारखे मनापासून बोलत नाही, ती आपल्याला टाळत असते याचा जाब त्याने तिला एकदा विचारला होता. त्यावेळी तिने त्याला माझे तुझ्यावरच काय दुसऱ्या कुणावरही प्रेम नाही असे ठणकावून सांगितले होते. त्यामुळे तर तो अलिकडे जास्तच तिच्यावर चिडला होता. ती आपल्यावर प्रेम करीत नाही याचा त्याला राग आलेला होता. तो तिच्यावर मनापासून प्रेम करीत असल्याने त्याने तिला बऱ्याच वेळेला आपल्या प्रेमाचा स्विकार कर असे सांगितले होते. पण तिचे त्याच्यावरच काय इतर कुणावर ही प्रेम नसल्याने तिने त्याला आपल्यापासून दूर राह तुझा माझा काही संबंध नाही असे सांगितले होते. तो तिला आता कायमचा धडा शिकवू इच्छित होता. त्याने मनातून तसे प्लॅन केलेला होता. ती जर आपली होणार नसेल तर तिला दुसऱ्या कुणाचीही होऊ दयायचे नाही असा त्याने चंगच बांधला होता. तो तिला धडा शिकविण्यासाठी संधी शोधत होता. शनिवार दि.१५ मे २०२१ रोजी सुवर्णाचे आई वडिल पांढुर्णा (केंदरलिंग) येथे एका नातेवाईकाकडे गेले होते. तर तिचा भाऊ श्याम हा त्याच्या कामा निमित्य देवठाणे येथे गेला होता. घरात फक्त सुवर्णा ही आपल्या वयोवृध्द आजी सोबत होती. सकाळी ९.३०च्या दरम्यान ती घरासमोरच्या अंगणात भांडी घासत असताना एकदमच तिच्या समोर आकाश येऊन प्रकटला. त्याच्या डोळ्यात तिला राग दिसत होता. तो आल्या आल्या त्याने सुवर्णाच्या आजीला एका खोलीत डांबून घातले आणि भांडी घासणाऱ्या सुवर्णाला माझ्याशी लग्न कर चल असे म्हणत तिच्याशी भांडण करीत तिच्या हाताला धरून ओढू लागला. त्यावेळी तिने त्याचा हात झिडकारून त्याच्या थोबाडीत मारली होती. याचा त्याला राग आला होता. आज कोणत्याही परिस्थिती तिचा सोक्ष मोक्ष लावायचा असे ठरवूनच तो आला असल्याने त्याने रागाच्या भरात सुवर्णाच्या अंगावर आपल्याकडील चाकूने तिच्या पोटात जोरदार वार केले. तसे ती ओरडत जागीच पडली. आजूबाजुला ही कुणी नव्हते. याच संधीचा फायदा घेत त्याने परत गुप्तीने तिच्यावर वार करीत होता. ती रक्तंबबाळ अवस्थेत तडफडत होती. तर तिच्यावर आकाश वार करीत असल्याचे बघून खोलीत कोंडून ठेवलेली आजी जोर जोरात ओरडत होती. तो ती रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर पडल्याचे बघून तो तेथून पळून गेला. ती तडफडत असल्याचे बघून आणि आजीच्या ओरडण्याने शेजारचे आणि आजूबाजूचे लोक जमा झाले. त्यांनी गंभीर रित्या जखमी असलेल्या सुवर्णा हिला उपचारासाठी पुसद येथे दाखल केले होते. परंतू तिचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची माहिती समजातच तिचे पांढुर्णा येथे गेलेले तिचे आई वडिल आणि देवठाणे येथे गेलेला तिचा भाऊ श्याम हा ही रामपूरनगर येथे परत आलेला होता. आपल्या बाहिणीची हत्या गावातीलच आकाश आडे याने केल्याची त्यांना माहिती मिळताच त्यांनी या घटनेची माहिती खंडाळा पोलीसांना दिलेली होती. या घटनेची माहिती पोलिसांना समजातच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती मयत सुवर्णा हिच्या आई वडिल आणि भावाकडून घेतली होती. तसेच आजीने ही बघितलेली घटना पोलीसांना सांगितली होती. पोलीसांनी मयत सुवर्णाचा मृतदेह पुसद येथील त्याच शासकीय दवाखान्यात शवविच्छेदन करून डॉक्टराकडून माहिती घेतली होती. या घटनेनंतर संशयीत आरोपी हा घटनास्थळावरून पळून गेला होता. पोलीस त्याचा शोध घेत असताना तो जवळच्याच घनसाळ जंगलात लपून बसल्याची माहिती पोलीसांना मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याला त्याच दिवसी घनसाळ येथील जंगलातून ताब्यात घेतले. त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे सुवर्णा चव्हाण हिच्या हत्येविषयी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी मयत सुवर्णा भाऊ श्याम चव्हाण याच्या फिर्यादीवरून खंडाळा पोलीसात सुवर्णा अर्जून चव्हाण (वय २१) हिच्या खून प्रकरणी आकाश श्रीराम आडे (वय २५) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला पुसद येथील कोर्टासमोर हजर केले असता. मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान आकाशकडून पोलीसांनी गुन्हयात वापरलेला चाकू आणि गुप्ती जप्त केली होती. या घटनेचा पुढील तपास खंडाळा पोलीस करत आहेत. एकतर्फी प्रेमातून विकृत मानसिकतेतून अशा प्रकारच्या घटना घडतात म्हणून अशा प्रकारची मानसिकताच बदलली पाहिजे. नाही तर अशा प्रकारच्या विकृतीला सुवर्णा सारख्या युवती बळी पडतील. या अगोदर देखील अशा प्रकारच्या विकृतीतून अनेक घटना घडलेल्या आहेत. प्रियेसीच्या सुखात आपले सुख मानून खरे प्रेम केले तर ते प्रेम ठरते नाहीतर तिच्या प्रेमात विकृत बनून देवदास बनून राहिले तर त्याच्या खूनाच्या घटना या घडत राहतील यात काही शंका नाही. सुवर्णाने त्याला कितीतरी वेळा समजावून सांगितले तरी त्याची काही मानसिकता बदलली नव्हती. त्यातूनच तो तिच्यासाठी वेडा पिसा झाला आणि विकृत बनला. या विकृतीतूनच त्याने तिच्यावर हल्ला करून तिला संपवून टाकले हिच खरी आजच्या तरूणाईची शोंकांतिका आहे. आकाश सारखे तरूण प्रेमाचा खरा अर्थ समजावून घेत नाहीत आणि त्यातून ते आशा प्रकारची घटना जाणून बजून करतात हेच या घटनेवरून दिसून येते.

24 TO 30 MAY 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 22/05/2021 7:01 PM Page 1



# देवणी ग्रामीण रुग्णालयाची रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याने रुग्णांची होतेय गैरसोय



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यात एकमेव असलेली देवणी ग्रामीण रुग्णालयाची १०८ रुग्ण वाहिका वारंवार नादुरुस्त होत असल्याने परिणामी रुग्णांना रुग्णालयात पोहचविण्यापुर्वीच रुग्णवाहिकेला द्या हो धक्का म्हणावे लागत आहे. यात गंभीर रुग्णांची हेळसांड होत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केले जात आहे. देवणी येथील ग्रामीण रुग्णालयाची १०८ ही रुग्ण वाहिका गेल्या महिनाभरापासून नादुरुस्त अवस्थेत अपातकालीन सेवा बजावत आहे. मात्र कोरोनाच्या महामारीत रुग्ण वाहिकेला धक्का देत रुग्णालयात पोहचण्यास उशीर होत असल्याने दे धक्का रुग्ण वाहिकेला अशी चर्चा तालुक्यात रंगत आहे. ५० लाख रुपये किमतीची ही महागडी १०८ रुग्ण वाहिका अलीकडे वारंवार नादुरुस्त होत असून गेल्या एक महिन्यापासून चालू-बंद अवस्थेतच आहे. गेल्या आठवड्यात रस्त्यातच बंद पडल्याने टोचन करून लातूर येथील गॅरेजला पाठवण्यात आली असून तेथे त्यांच्या सोयीनुसार व वेळेनुसार दुरुस्तीचे काम सुरु असल्याचे समजते. ऐन कोरोनाकाळात नादुरुस्त राहणे अथवा बंद पडणे यामुळे रुणाची विशेषतः गरीब रुणाची मोठी तारांबळ उडाली आहे याकडे पालकमंत्री अमित देशमुखांनी लक्ष घालून लवकरच रुगवाहेकेची सोय करून द्यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

# पोलिसांच्या आशिर्वादाने जेऊर बीटमध्ये अवैध धंदे जोमात

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

अक्कलकोट साऊथ पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या जेऊर बीट च्या हद्दीतील गावात व जेऊरमध्ये ही अवैध धंदे चांगलीच बोकाळले असून पोलीस कर्मचारी व पोलीस अधिकारी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत. सध्या सोलापूर जिल्ह्यात व अक्कलकोट तालुक्यात कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे शासनाने लॉकडाऊन केले असले तरी लॉकडाऊन नावालाच आहे. लॉकडाऊनमध्ये सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत किराणा दुकान, दुधडेअरी, भाजीपाला यांना वेळ लागू होता, त्यांनाही बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आला. मात्र हातभट्टी दारू, देशीविदेशी दारू, मटका, ताडी, गुटखा, चंदन तस्करी ही सर्व धंदे चोवीस तास खुलेआम सुरू आहेत. कारण यांच्याकडून हप्ता वसुली मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या हद्दीत अवैध धंदे तत्कालीन पोलीस निरीक्षक विजय जाधव यांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचे जनतेतून चर्चीले जात आहे. गेल्या आठवड्यात पोलीस निरीक्षक जेऊरकडे राऊंडसाठी आले असताना एका टपरीवाल्याकडे गुटखा मिळाला, ते घेऊन गेले साधी चौकशी ही केली नाही. आता नूतन पोलीस निरीक्षक राजेश गवळी ही सर्व अवैध धंदे बंद करण्यात यशस्वी ठरणार का? याकडे बीटच्या नागरिकांचे लक्ष वेधले आहे. या हद्दीतील काही गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांचेही अवैध धंदे मोठ्या प्रमाणात आहेत. तरी त्यांच्यावर कधी कारवाई करण्यात आली नाही आणि कारवाई झाली तरी त्यांच्या बदली दुसऱ्याच्या नावावर गुन्हा दाखल करण्यात येतो. दोन दिवसाअगोदर सायंकाळी एका दारू अड्ड्यावर धाड टाकण्यात आली. मात्र माल जप्त करण्यात आला व काही रक्कम घेऊन सोडून देण्यात आले. गुन्हा देखील दाखल करण्यात आला नाही.

जेऊर बीटच्या हद्दीत सोळा गांवे आहेत. जेऊर, हंजगी, गौडगाव खु||, नागनहळ्ळी, बॅगेहळ्ळी, दोड्याळ, बासलेगाव, गळोरगी, हंद्राळ, ईटगे, जकापुर, मिरजगी, मातनहळ्ळी, रामपुर, कंट्टेहळ्ळी, जेऊरवाडी आदी गांवे या बीटच्या हद्दीत आहेत. जेऊर बीटच्या हद्दीमध्ये मटका, जुगार, चंदन तस्करी, हातभट्टी दारू, बनावट दारू, देशी विदेशी, व्हिस्की, रम, बिअर, विक्रेते, गुटखा, वाळू तस्करी, गांजा तस्करी आदी धंदे मोठ्या उत्साहात सुरु आहेत. चंदन तस्करी तर फार मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे बोलले जात आहे, याकडे बीटचे पोलीस कर्मचारी व पोलीस अधिकारी चिरीमिरीमुळे अर्थपूर्ण दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. काही गावात तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या बाजूलाच चहा कॅटींन, रेस्टॉरंट मधून ही दारू विकली जात आहे. काही गावात ग्रामपंचायत कार्यालय व तलाठी कार्यालयाच्या जवळ ही अवैध धंदे सुरू आहेत. लॉकडाऊन अगोदर ५०० रुपये हप्ता घेत होते, आता १५०० रुपये हप्ता सुरू आहे. तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी कृष्णकांत उपाध्याय हे कार्यरत असताना अक्कलकोट शहर व ग्रामीण भागातील सर्वच अवैध धंदे बंद झाले होते. अवैध धंद्यावर आळा घालण्यात यश ही आले होते. त्यांनी खाकीची व दंडुक्याची धमक दाखविली होती. त्यांचा बदली झाल्यापासून मात्र अवैध धंदेवाल्यांनी पुन्हा डोकेवर काढले आहे. अनेक गावांमध्ये हमरस्त्यावर ढाब्यावर ही दारू उपलब्ध आहे. या प्रकरणाची स्वतः सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी सखोल चौकशी करून अवैध धंदे बंद करण्याची मागणी जेऊर बीट परिसरातील नागरिकांतून व महिला वर्गातून होत आहे. कारवाईसाठी आदेश सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या विभागाकडे देण्यात यावी, असे जनतेतून मागणी आहे.

# चंद्रपूरमध्ये दारू तस्करी करणाऱ्या पाच जणांना ठोकल्या बेड्या




**चंद्रपूर/प्रतिनिधी**

चंद्रपूर शहरातील रामनगर पोलिस ठाणे हद्दीत दारूतस्करांविरुद्ध एकाच रात्री तीन कारवाया करण्यात आल्या. यावेळी १६ लाखांचा मुद्देमाल जप्त करीत पाच तस्करांना बेड्या ठोकल्या. दारूतस्करी होत असल्याच्या गुप्त माहिती नंतर पोलिस अधीक्षक अरविंद साळवे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांच्या नेतृत्त्वात या कारवाया करण्यात आल्या. शहरातील रामनगर चौकात नाकाबंदी करीत पहिली कारवाई करण्यात आली. यावेळी एमएच ३४ एम ९९३५ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाची तपासणी केली. यावेळी शक्ती संजू शाह (वय ३७, रा. बायपास रोड), लक्ष्मीनारायण पुतान परसराम (वय ३५, रा. अष्टभुजा वॉर्ड), रवींद्र विजय गुजर (वय ३०, रा. अष्टभुजा वॉर्ड) हे तिघे वाहनात होते. वाहनातून विदेशी दारूचा साठा आढळून आला. पोलिसांनी वाहन आणि दारूसाठा असा सुमारे दहा लाख तीन हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

रेल्वेस्थानक चौकात दुसरी कारवाई करीत साजिद इसाक कुरेशी (वय ३१, रा. शास्त्रीनगर, वणी) याला अटक केली. हा एमएच २९ एम ५९६७ क्रमांकाच्या आटोने दारूची तस्करी करीत होता. यावेळी दीड लाख रुपये किमतीची देशी दारू, बिअर असा सुमारे दोन लाख चार हजार चारशे रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच जनता कॉलेज चौकात तिसरी कारवाई करण्यात आली. यावेळी एमएच ३४ बीबी १४७२ क्रमांकाच्या चारचाकी वाहनातून दारूतस्करी केली जात होती. पोलिसांनी वाहनाची तपासणी करीत एक लाख रुपये किमतीची देशी दारू आणि वाहन असा सहा लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी चालक ईश्वर रमेश वाघमारे (वय २६, रा. हॉस्पिटल वॉर्ड, चंद्रपूर) याला अटक केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाई अवैध दारूतस्करांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

# देवणी पोलिसांनी १३ लाखांची दारू पकडली

**देवणी/शकिल मनियार**

देवणी येथील बोरोळ रस्त्यावर देशी दारुची चोरुन विक्री करण्यासाठी वाहतूक करणाऱ्या पिकअप बोलेरो जीपसह १२ लाख ७८ हजार ८६५ मुद्देमाल जप्त करुन स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पोलीसांच्या वतीने देवणी पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, सोमवार दि. १७ मे रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास देवणी येथील बोरोळ चौक ते बोरोळकडे जाणाऱ्या रस्त्यावर देशी दारुचे १९४ बॉक्स व १८० एम.एल. देशी दारुच्या १७४ खुल्या बाटल्या व ९० एम.एल.च्या बाटल्यांचे पाच बॉक्स असे पिक अप बोलेरो जीपसह एकुण १२ लाख ७८ हजार ८६५ रुपये किमतीचा माल चोरून विक्री करण्यासाठी वाहतूक करीत असताना मुद्देमालसह मिळून आला व कोरोना विषाणूचा संसर्ग वाढेल अशी घातक कृती करून स्वतःचे व इतर जनतेच्या




जीवीतास व व्यक्तीगत सुरक्षितेस बाधक करुन कोणतीही सुरक्षेची काळजी न घेता संसर्ग पसरविण्याची हायगयची कृती करून जिल्हाधिकारी लातूर यांच्या आदेशाचे उल्लंघन करताना मिळून आला या प्रकरणी लातूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस नाईक रवींद्र निवृत्ती गोंदकर यांच्या फिर्यादिवरुन देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १५७/२०२१ कलम ६५ (अ)(ई) ८१, ८३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम २६९, १८८ भादवी व राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ (ब), महाराष्ट्र कोविड उपाययोजना २०२० चे नियम ११ साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७ चे कलम २, ३, ४, नुसार नागनाथ गंगाधर बिरादार वय २८ वर्षे राहणार वडमुरंबी ता.देवणी व सागर मोरखंडे हालमुकाम निटूर ता. शिरुर अनंतपाळ यांच्या विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास देवणी पोलीस नाईक विनायक कांबळे हे करीत आहेत.

# देवणी तालुका अध्यक्षपदी शेषराव मानकरी यांची निवड

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी येथील सामाजिक कार्यकर्ते शेषराव मानकरी यांची लिंगायत महासंघाच्या देवणी तालुका अध्यक्ष पदी निवड झाल्याची घोषणा महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांनी केली. देवणी येथील शेषराव मानकरी यांचे तालुक्यातील सामाजिक, धार्मिक, कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे. उर्वरित शहर व तालुका कार्यकारणी लवकरच करण्यात येईल असे माहिती लिंगायत महासंघाचे सरचिटणीस चंद्रकांत काला पाटील यांनी केले आहेत. या निवडीबद्दल श्रीगुरूलिंगेश्वर विरक्त मठाचे मठाधिपती सिद्धलिंग महास्वामीजी, सिद्धेश्वर शिवाचार्य महाराज, आळंद, लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ. काशिनाथ राजे, जिल्हासंघटक नागनाथअप्पा भुरके, माणिक कोकणे, वैजनाथ जट्टे, विजयकुमार कुडुंबले, सिद्रामप्पा पोपडे, सी.एम. बिराजदार, विजयकुमार मानकरी ,बाबुराव लांडगे, जनकराज जिवणे, विजयकुमार लुल्ले, वैजनाथ लुल्ले, आनंद जिवणे, अमोल जिवणे, सागर घटबाळे आदींनी अभिनंदन करुन पूढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पत्नीच्या हत्येप्रकरणी पतीला जन्मठेपेची शिक्षा

**जळगाव/प्रतिनिधी**

पत्नीला कायम मुलीच होतात म्हणून पत्नीचा खून केल्याप्रकरणी पतीला जन्मठेपेची शिक्षा जळगाव सत्र न्यायालयाने सुनावली आहे. या खटल्याच्या न्यायालयीन कामकाजात सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड. केतन ढाके यांची मेहनत फळाला आली.

जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथील विवेकानंद नगर तांडा येथे आरोपी पप्पु रतन पवार (३१) हा त्याची मयत पत्नी कस्तुरबाई (३०) व त्यांच्या तीन मुलींसह राहत होता. आरोपी पप्पु पवार हा पाचोरा येथेच एक हॉटेलवर कामाला होता. त्याला दारू पिण्याचे सुद्धा व्यसन होते. दि.९/६/२०१९ रोजी रात्री कस्तुराबाईला मुलीच होतात या कारणाने आरोपीने कस्तुरबाईशी भांडण करून तिला शिवीगाळ केली व लाकडी दांड्याने डोक्यात मारले त्यामुळे ती खाली पडली. त्यानंतर आरोपीच्या घराच्या शेजारी राहणारे त्याचे भाऊ व वहिनीने पाचोरा येथील रुग्णालयात घेऊन गेले, परंतु त्याठिकाणी तिला मयत घोषित करण्यात आले. सदर घटनेची फिर्याद मयताची आई पद्मबाई सखाराम राठोड (६०) हिने पाचोरा पोलीस स्टेशनला भादवि कलम ३०२,५०४ अन्वये गु.र.नं. २३७/१९ ला आरोपी पप्पु रतन पवारचे विरुद्ध दिली. आरोपीला या गुन्ह्याचे कामी दि. १०/०६/२०१९ रोजी अटक करण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास पोलिस उप निरीक्षक पंकज शिंदे यांनी केले. आरोपीच्या विरुद्ध प्रथम दर्शनी पुरावा दिसुन येत असल्यामुळे आरोपीच्या विरुद्ध दोषारोप दाखल करण्यात आले. आरोपीच्या विरुद्ध सदरचा खटला सर्वप्रथम तत्कालीन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जि.ए.सानप याच्या समोर चालले. त्यांच्या समक्ष या खटल्याचे कामी सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील केतन ढाके यांनी आठ साक्षीदार तपासले, परंतु त्यांची बदली झाल्यामुळे व त्यानंतर कोरोनाच्या निर्बंधामुळे सदर खटला पुढे चालु शकला नव्हता, परंतु त्यानंतर डिसेंबर २० मध्ये प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.डी. जगमालानी यांच्या समोर सरकार पक्षाने उर्वरित दोन साक्षीदार तपासून ह्या खटल्याचे कामी पुरावा



ॲड. केतन ढाके

ठेवण्याचे काम पूर्ण केले. या खटल्याचे कामी जिल्हा सरकारी वकील केतन ढाके यांनी एकूण १० साक्षीदार तपासले. यात प्रामुख्याने आरोपीची मोठी मुलगी कु.गौरी हिची साक्ष महत्वपुर्ण ठरली कारण ही सर्व घटना तिच्या समोर घडलेली असल्यामुळे तिने सर्व घटनाक्रम जसाचा तसा न्यायालयासमोर संगीतला व घटना करणारा व्यक्ती कोण आहे असे विचारले असता तिने तिच्या वडिलांकडे म्हणजेच आरोपिकडे बोट दाखवले. या व्यतिरिक्त स्वतः फिर्यादी पद्मबाई राठोड, डॉ. निलेश देवराज पंच साक्षीदार व पो.उ.नि.पंकज शिंदे यांच्या साक्षी महत्वाच्या झाल्यात. आज प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.डी. जगमालानी यांनी कस्तुरबाई पवार हिचा खून केला म्हणून तिचा पती पप्पु रतन पवार याला दोषी ठरवून जन्मठेपेची व ५००० दंडाची शिक्षा ठोठावली. सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील केतन ढाके यांनी बाजू मांडली. आज न्यायालयाने सदरची शिक्षा व्हिडिओ कॉन्फरन्स वर सुनावणी घेऊन ठोठावली.

# इंधन दरवाढीविरोधात राष्ट्रवादीचे आंदोलन



**वाडा/प्रतिनिधी**

देशावर कोरोना महामारीने संकट ओढवले असताना केंद्र शासनाने घरगुती गॅस, पेट्रोल, डिझेल यांच्यात भरमसाठ दरवाढ केली असल्याने सर्वसामान्य महिलांचे गणित डगमगले आहे. याची राष्ट्रवादी महिला काँग्रेसने दखल घेत महिला प्रदेशाध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या आदेशानुसार तसेच पालघर जिल्हा निरिक्षिका सुनिता देशमुख व महिला जिल्हा अध्यक्षा किर्ती मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली पालघर जिल्ह्यातील गाव, खेड्या, पड्यांमधून केंद्र सरकारच्या विरोधात घोषणा देत आंदोलन करण्यात आले. वाडा तालुक्यातील कापरी, कंचाड, मोज या गावातून कोरोना संदर्भातील सर्व नियमांचे पालन करून निदर्शने करण्यात आली. यावेळी महिला तालुकाध्यक्ष मृणाली नडगे, पालघर जिल्हा परिषद सदस्या अक्षता चौधरी, बिलघर ग्रामपंचायत माजी उपसरपंच सुजाता राऊत नजीकच्या गाव पाड्यातील महिला उपस्थित होत्या.

# विनामस्क व अकारण फिरणाऱ्यांवर वाडा पोलिसांची कारवाई



**वाडा/प्रतिनिधी**

कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शनिवारी व रविवारी कडक लॉकडाउनची अंमलबजावणी होत असल्याने या दोन दिवसात सर्व दुकाने कडकडीत बंद ठेवली जात आहेत मात्र सोमवारी हीच दुकाने सकाळी ७ ते ११ वाजताच्या दरम्यान चालू ठेवण्याची सवलत देण्यात आली आहे. काही नागरिक या सवलीतीचा गैरफायदा घेत शहरात दोनचाकी, चारचाकी वाहने घेऊन विनाकारण फिरतात व बाजारात नको ती गर्दी करतात यांना आळा घालण्यासाठी सोमवारी खंडेश्वरी नाका येथे पोलीस निरीक्षक सुधीर संखे यांच्या मार्गदर्शनाखाली दंडात्मक कारवाई करण्यात आली. दरम्यान विनाकारण फिरणाऱ्या वाहन चालकांना नाक्यावरूनच परत पाठविण्यात आले तर खाजगी वाहनांना महाराष्ट्र शासन लिहलेला फलक लावलेल्या वाहनचालकांवरही या वेळी कारवाई करण्यात आली. अशा विविध प्रकाराणातील एकूण सोळा जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक सुधीर संखे यांनी दिली. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक रुपाली गुंड, पोलीस उपनिरीक्षक समीर लोंढे पोलीस उपनिरीक्षक खंदरकर व पोलीस कर्मचारी यांनी केली.

# देवणी येथील ग्रामीण रुग्णालयात ३ ऑक्सिजन कॉंसन्ट्रेटरचे लोकार्पण

**देवणी/प्रतिनिधी**

ग्रामीण रुग्णालयात अक्का फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्यातून व मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अग्रिकल्चर, पुणे यांच्या माध्यमातून देण्यात आलेल्या ३ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरचा भाजपा पदाधिकाऱ्याच्या हस्ते लोकार्पण करण्यात आला. अक्का फाउंडेशनच्या आर्थिक सहकार्यातून व मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अग्रिकल्चर, पुणे यांच्या माध्यमातून निलंगा येथे एकुण १५ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर उपलब्ध झाले होते. आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या सूचनेनुसार निलंगा येथे ०७, शिरूर अनंतपाळ येथे ०३, देवणी येथे ०३ व कासार शिरसी येथे ०२ असे आवश्यकतेनुसार वाटप करण्यात आले आहे. यावेळी देवणी ग्रामीण रुग्णालयात लोकार्पण कार्यक्रमास वैद्यकीय अधीक्षक डॉ निळकंठ सगर, नगराध्यक्ष वैजनाथ अष्टुरे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष मनोहर पटणे, नगरसेवक बाबुराव इंगोले, अमर पाटील, रमेश मन्सुरे, बालाजी सुर्यवंशी, सुर्यभान विप्तल, मयुर पटणे, सचिन कडगे, बंडेप्पा घटबाळे आदी उपस्थित होते.

# बनावट नोंद प्रकरणी तलाठी, मंडल अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीची प्रातांची नोटीस!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे गावात पतीच्या निधनानंतर वारस म्हणून कायदेशीर पत्नी आणि मुलांची नावे न लावता बनावट प्रतिज्ञापत्र आणि खोटी कागदपत्रे वापरून संगनमताने अनधिकृत महिलेचे नाव सात बारा उतारावर लावल्याप्रकरणी तलाठी आणि मंडल अधिकारी यांना निलंबित करून खातेनिहाय चौकशी का करू नये, याबाबतची नोटीस बजावण्यात आली आहे. त्यामुळे महसूल खात्यात खळबळ उडाली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे येथील शेतकरी बसवराज तोरणगी यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा रोहित तोरणगी यांनी विहीत नमुन्यातील अर्ज देऊन वडिलांच्या पश्चात शेतजमीनीचे वारसदार म्हणून नाव लावण्याची विनंती तलाठीकडे केली होती. दरम्यान पार्वती सिद्राम कुरे या अनधिकृत महिलेने तहसीलदारांचा बोगस शिक्का मारलेले बनावट प्रतिज्ञापत्र आणि अवैध पुरावे देऊन मयताची पत्नी असल्याचा बनाव करून तलाठी यांच्याकडे आपल्या नावाच्या नोंदीसाठी अर्ज दिला होता. ती बेकायदेशीर कागदपत्रे ग्राह्य धरून तलाठी राहूल वाघमारे यांनी अनधिकृत महिलेची नोंद घेतली. त्याला राहूल तोरणगी यांनी लेखी हरकत नोंदवली होती. मात्र करजगीचे मंडल अधिकारी मनोज गायकवाड यांनी त्या हरकतीची दखल न घेता बनावट कागदपत्राद्वारे तलाठी यांनी घेतलेली बेकायदेशीर नोंद प्रमाणित केली. त्यानंतर कायदेशीर वारसदार रोहित तोरणगी यांनी त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी बसवराज बगले यांच्या मार्फत अपिल केले. उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी सोलापूर यांनी सुनावणी घेऊन संबंधित कागदपत्रे तपासली आणी युक्तीवाद ऐकून तलाठी आणि मंडल अधिकारी यांच्या बेकायदेशीर नोंदीला स्थगिती दिली.

याशिवाय बसवराज बगले यांनी या प्रकरणी तलाठी आणि मंडल अधिकारी यांनी अनधिकृत महिलेशी संगनमत करून, खोटी आणि बनावट कागदपत्रे तयार करून शेतजमीन हडपण्यासाठी फसवणूक केल्याबद्दल त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी आणि खातेनिहाय चौकशी करून सेवेतून बडतर्फ करावे, अशी मागणी केली आहे. त्यानुसार प्रांताधिकारी दिपक शिंदे यांनी सुलेरजवळगेचे तलाठी राहूल वाघमारे आणि करजगीचे मंडल अधिकारी मनोज गायकवाड यांना या गंभीर अपराधाबद्दल निलंबन आणि खातेनिहाय चौकशीची कारवाई का करू नये? याचा खुलासा ४८ तासाच्या आत करावा, अशी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यामुळे बेकायदेशीर कामकाज करून शेतकरी आणि मिळकतदारांची लुबाडणूक करणारे महसूल कर्मचारी आणि तलाठी, सर्कल यांच्यात खळबळ उडाली आहे.

CMYK

# भवरलाल अँड कांताबाई जैन फौऊंडेशनचे कोरोना रुग्णासाठी ऑक्सिजन कंसेंटेटर

**जळगाव/प्रतिनिधी**

गेल्या दीड वर्षापासून सर्व नागरिक कोरोना विषाणूला सामोरे जात आहेत. या प्रसंगी अनेकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. गेल्या काही महिन्यापासून रुग्णालयात बेड न मिळणे, ऑक्सिजन कंसेंटेटरची कमतरता, जीवरक्षक औषधी व इंजेक्शनची कमतरता या समस्यांमुळे अनेक कुटुंबांनी आपली जिवाभावाची माणसे गमावली आहेत. अद्यापही असंख्य नागरिकांची ससेहोलपाट सुरुच आहे.



गृह विलगीकरणातील बऱ्याच रुग्णांना ऑक्सिजन कंसेंटेटरची नितांत आवश्यकता आहे. ही गरज पूर्ण होण्यासाठी भवरलाल अँड कांताबाई जैन फौंडेशन तसेच विनमार ओव्हरसीज पॉलीमर्स प्रा. लि., मुंबई यांच्या वतीने २५ ऑक्सिजन कंसेंटेटर उपलब्ध करण्यात आले आहेत. सदरची मशीनरी कांताई नेत्रालयात उपलब्ध राहणार आहे. ज्या रुग्णांना याची गरज भासणार आहे त्यांनी रुग्णास ऑक्सिजनची गरज असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र, किती लिटर ऑक्सिजनची आवश्यकता आहे त्याचा तपशील, ज्या रुग्णांसाठी आवश्यकता आहे त्यांचे आधारकार्ड, पूर्ण पत्ता व इतर आवश्यक असणारा तपशील, मशीन नेणाऱ्याचे आधारकार्ड, ओळख असणाऱ्या व्यक्तीचा संपूर्ण तपशील आदी बाबी सादर करणे आवश्यक राहणार आहे. या फौंडेशनच्या वतीने निशुल्क दिली जाणारी ऑक्सिजन मशीन ही ५ लिटर क्षमतेची आहे. रुग्णास लागणाऱ्या ऑक्सिजन कंसेंटेटरची आवश्यकता नसल्याचे चित्र लक्षात आल्यानंतर हे ऑक्सिजन कंसेंटेटर कांताई नेत्रालयास परत करायाचे आहे. ऑक्सिजन कंसेंटेटर अभावी कोणत्याही रुग्णास आपला जीव गमवावा लागू नये याच भावनेतून भवरलाल अँड कांताबाई जैन फौंडेशनच्या वतीने ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या ऑक्सिजन कंसेंटेटरची गरज असणाऱ्या रुग्णाच्या नातेवाईकांनी ऑक्सिजन कंसेंटेटरच्या उपलब्धते बाबत विजय मोहरीर (९४२३७७४३४६), सुधीर पाटील (९८२३३६२३३०), उदय महाजन (९४२२७७६७०८), अनिल जोशी (९४३२५९४४८७), नितीन चोपडा (९४२३४८९८२४), अमर चौधरी (९३७२४०९४६८), डॉ. प्रदीप ठाकरे (९४२२७७५९०६) कांताई नेत्रालय, निमखेडी रोड येथे संपर्क करावा असे आवाहन फौंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. जैन उद्योग समुहाचे संस्थापक भवरलालजी जैन यांनी सन १९८२ मध्ये सामाजिक उत्तरदायित्व जबाबदारी म्हणून जैन चॅरिटीज्ची स्थापना केली. ही संस्था आता कालांतराने भवरलाल अँड. कांताबाई फौंडेशन अशी नोंदणीकृत झाली. समाजाला प्रामुख्याने शिक्षण, आरोग्य, क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, अध्यात्म, पर्यावरण आणि जीवनावश्यक बाबी इत्यादी करीता मदतीची आवश्यकता असते. ही संस्था विविध जाती धर्माच्या गरजू, आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्यांना निरपेक्ष भावनेने मदत करीत असते. दातृत्वाचा हा वसा मोठेभाऊ अर्थात भवरलालजी जैन यांच्याकडून पुढच्या पिढीस मिळाला असून या संस्थेची व्याप्ती व कार्य वाढलेले आहे. विनमार ओव्हरसीज पॉलीमर्स प्रा. लि. ही मुंबईस्थित पॉलीमर क्षेत्रातील जागतिक पातळीवरची मोठी कंपनी आहे. ही कंपनी गत ४० वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत असून प्लास्टिक व केमिकल्सच्या वितरण व विपणण क्षेत्रात अग्रेसर आहे. ११० देश अर्थात जगभरात कंपनीची विक्री व्यवस्था आहे. जग भरात सुमारे ५० कार्यालये या कंपनीचे आहेत. ही कंपनी सीएसआर निधीतून म्हणजेच कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी (व्यावसायिक सामाजिक जबाबदारी) विविध सामाजिक लोककल्याणकारी कार्य करीत असते. विनमार व जैन इरिगेशन कंपनी आता कोविड-१९च्या आव्हानात्मक परिस्थितीत मिळून मदत करण्यासाठी कटीबद्ध झालेली आहे.

## तौक्ते चक्रीवादळातील बाधितांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

**वाडा/प्रतिनिधी**

तौक्ते या चक्रीवादळाने थैमान घातल्याने पालघर जिल्ह्यासह इतर तालुक्यातील गाव-खेडे प्रभावित झाले आहेत. चक्रीवादळाचा तडका इतका भयंकर होता की त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक घरांवर झाडे उन्मळून पडली आहेत, घरे, रस्ते, दुकाने इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. शहरी भागासह ग्रामीण भागातील नागरिकही रस्त्यावर आले आहेत, अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे. शेतकरी, वीटभट्टी उद्योजक, मजूर, कामगार, कष्टकरी अगोदरच कोरोनाच्या महामारी व लॉकडाउन मुळे मेटाकुटीला आलेले असताना आता या चक्रीवादळाने जगणे नकोसे करून सोडले आहे. तरी सरकारने याचा सहानुभूती पूर्वक विचार करून बाधित नागरिकांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी भाजपचे पालघर जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील यांनी जिल्हा अधिकारी डॉ.माणिक गुरसळ व विरोधी पक्षनेते प्रविणजी दरेकर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तीन दिवसांच्या चक्रिवादळामुळे अनेक लोकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकरीवर्गाने पावसाळ्यासाठी ठेवलेले जनावरांचे वैरण भिजले आहे, विटभट्टींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, मच्छीमार बांधवांचे ही वादळामुळे नुकसान झाले आहे. तसेच संपूर्ण जिल्ह्यामध्ये आंबा, चिकु व जांभुळ या फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, या सर्वाचे तांतडीने पंचनामे होऊन शासनाकडून आर्थिक सहकार्य करण्याची मागणी पाटील यांनी केली आहे.

# चक्रीवादळामुळे खंडीत झालेला विजपुरवठा पुर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम सुरू -दादाजी भूसे

**पालघर/प्रतिनिधी**

म्युकरमायकोसीस तसेच लहान मुलांना होणारे आजार आणि कोव्हिड प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्ह्याचा आरोग्य आराखडा तयार करण्याचे निर्देश कृषी, माजी सैनिक कल्याणमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी आरोग्य विभागाला दिले. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी दादाजी भूसे बोलत होते. तोक्ते चक्रीवादळामुळे जिल्ह्यातील नऊशे (९००) गावांचा विजपुरवठा खंडीत झाला होता. यापैकी आठशे (८००) गावांचा विजपुरवठा पुर्ववत करण्यात आला. जवळपास ९४१ कर्मचारी व अधिकारी यांनी कमी वेळेत सदर गावाचा विजपुरवठा पुर्ववत करण्यासाठी परिश्रम घेतले. तोक्ते चक्रीवादळाच्या कालावधीत कोव्हिड रुग्णांना ऑक्सीजनची कमतरता भासू नये यासाठी ऑक्सीजनचा पुरेसा साठा करण्यात





आला होता. चक्रीवादळामुळे, शेती तसेच फळपिकांचे त्याचबरोबर मच्छीमार, वीटभट्टी कुक्कटपालन आदिचे नुकसान झाले आहे. शासनाच्या निकषानुसार त्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी शासनस्तरावर प्रस्ताव तयार करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. जिल्ह्यासाठी सुसज्य आणि अद्ययावत सामान्य रुग्णालय निर्माण करण्यासाठी आरोग्य विभागाला सुचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील जव्हार, डहाणू आणि पालघर येथे ऑक्सीजन निर्मिती करण्यासाठीचा प्रकल्प येत्या महिन्याभरात पुर्णत्वास येईल असेही पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. उर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी पालघर जिल्ह्यातील खंडीत झालेल्या विज पुरवठ्याच्या कामाची पाहणी केली. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा भारती कामडी, खासदार राजेंद्र गावित, सर्वश्री आमदार श्रीनिवास वनगा, सुनिल भुसारा, राजेश पाटील, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यावस्थापकीय संचालक विजय सिंघल, जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिध्दाराम साळीमठ, पोलीस अधिक्षक दत्तात्रय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. किरण महाजन आदि अधिकारी आढावा बैठकीस उपस्थित होते.

**नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहिर होईल!**

'तोक्ते' चक्रीवादळामुळे शेतपिकांचे, फळपिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतीचा पंचनामा करण्यात आला असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहिर करण्यात येणार असल्याचे कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या वसई तालुक्यातील उंबरगोठण, तरीचा पाडा तसेच पालघर तालुक्यातील बहाडोली आदि गावांची पाहणी पालकमंत्री दादाजी भूसे यांनी केली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार राजेंद्र गावीत, उपस्थित होते. तोक्ते चक्रीवादळामुळे जिल्ह्यात तिन जणांचा मृत्यू झाला तर तिन जण जखमी झाले आहेत. तसेच घरांचे नुकसान झाले असून विद्यूत खांब देखील पडलेले आहेत. या सर्व नुकसानीचा पंचनामा करण्यात आला असून हा सर्व अहवाल शासन पातळीवर देण्यात येईल. शासनाच्या धोरणानुसार नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले.

## पोलीस पकडतील या भितीने अवैध धंदेवाला पळाला अन् चक्कर येऊन खाली कोसळताच जिवाला मुकला

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील नंदूर गावात अवैध व्यवसायिकांच्या घरावर छापा टाकायला आलेल्या पोलिसांना घाबरून पळून जाताना एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. नागेश हेगडे असं या २४ वर्षीय तरुणाचे नांव असून सदरची घटना मंगळवेढा तालुक्यातील नंदूर येथे घडली आहे. या घटनेतील तरुणाचा मृत्यू हा पोलिसांच्या पाठलागामुळे झाल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आणि मृतदेह पोलीस ठाण्याच्या आवारात आणला. शेवटी अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे यांनी या घटनेची उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याचे लेखी पत्र दिल्यानंतर नातेवाईक शांत झाले आहेत. नंदुर तालुक्यातील मंगळवेढा इथे हेगडे परिवारातील एक सदस्य अवैध व्यवसाय चालवतात. तसा गुन्हा यापूर्वी दाखल झालेला आहे. त्याच आधारे शुक्रवारी सकाळी १०:३० च्या सुमारास पोलीस अधिकारी व कर्मचारी गावातील हेगडे यांच्या दारू धंद्यावर कारवाई करण्यासाठी येताच त्यांना पाहून नागेश नाथा हेगडे( वय २४) हा युवक पळून जात होता. यावेळी पोलीस आपला पाठलाग करत असल्याचं पाहून काही अंतरावर तो चक्कर येऊन कोलमडून खाली पडला. त्यात तो बेशुद्ध झाला. त्याला गावातील डॉक्टराकडे



नेले असता डॉक्टरांनी त्याला उपचार करणेसाठी मंगळवेढा रुग्णालयाकडे नेण्यास सांगितले. त्यानुसार महिला हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले तेथील डॉक्टरांनी तपासणी करून मृत घोषित केले. यानंतर संतप्त नातेवाईकांनी तरुणाचा मृतदेह मंगळवेढा पोलीस ठाण्यासमोर आणला आणि संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी नातेवाईकांनी ठाण मांडले. जवळपास ३ तास मृत्यूदेह गाडीत ठेवला होता. याची माहिती कळताच अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी भेट देऊन कुटुंबियांशी चर्चा करून चौकशी करून दोषी असणाऱ्या पोलीसावर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. याची फिर्याद वडिल नाथा हेगडे यांनी दिली आहे. त्यानंतर तो मृत्यूदेह कुटुंबियांनी ताब्यात घेतला. याची सखोल चौकशी करण्यासाठी पंढरपूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत कदम यांच्याकडे तपास देण्यात आला आहे. सदर मयताची नोंद सीआरपीसी अकस्मात म्हणून नोंद केली आहे.

## अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान समजून पदाधिकाऱ्यांनी अन्नसेवेचे काम करावे!

**लातूर/प्रतिनिधी**

कोरोना रूग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु यावर उपाययोजना करणारी यंत्रणा तोकडी पडत आहे. याकडे राज्य शासनाचेही म्हणावे तसे लक्ष नाही. त्यामुळे रूग्ण व नातेवाईकांना अनेक अडचणीला सामोरे जावे लागत आहे. त्यांना लॉकडाऊन असल्यामुळे जेवनही मिळत नाही. ही बाब लक्षात घेवून भाजपा युवा मोर्च्याच्यावतीने कै.नागनाथ अण्णा निडवदे यांच्या स्मरणार्थ अन्नसेवा सुरू करून कोरोनाग्रस्त रूग्ण व नातेवाईकांना अन्नसेवेचा आधार दिला जात आहे. दिवसाकाठी हजार जणांना अन्नसेवा दिली जात असल्यामुळे या उपक्रमाचे कौतुक करून यापुढील कालावधीतही भाजयुमोच्या पदाधिकार्यांनी अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान समजून पदाधिकार्यांनी अन्नसेवेचे काम करावे, असे प्रतिपादन औसा मतदार संघाचे आमदार अभिमन्यु पवार यांनी केले.

यावेळी ते भाजपा युवा मोर्च्याच्यावतीने अटल अन्नसेवेच्या माध्यमातून कै.नागनाथ अण्णा निडवदे यांच्या स्मरणार्थ सुरू केलेल्या अन्नसेवा उपक्रमास सदिच्छा भेटी



दरम्यान ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमहापौर देवीदास काळे, भाजपा युवा मोर्च्याचे शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, जेएसपीएमचे प्रशासकीय समन्वयक निळकंठराव पवार,भाजयुमोचे प्रदेश सचिव दत्ता चेवले, भाजयुमो प्रदेश कार्यकारीणी सदस्य रविशंकर केंद्रे, जेएसपीएमचे शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील, समन्वयक बापुसाहेब गोरे, विनोद जाधव, प्राचार्य मोहन खुरदळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना आ.अभिमन्यु पवार म्हणाले की, रामभाऊ महाळंगी यांनी भाजपा कार्यकर्ता कसा असावा? याविषयी सांगितले होते. डोक्यावर बर्फाचा गोळा, जिभेवर साखर अन् पायाला भिंगरी लावून काम करणारा कार्यकर्ता असावा असे सांगितले होते. याची प्रचिती आज या अन्नसेवेच्या उपक्रमातून आली आहे. कै.नागनाथ अण्णा दिडवदे यांच्या स्मरणार्थ अन्नसेवा सुरू करून कोरोनाच्या परिस्थितीमध्ये रूग्ण व नातेवाईकांना मोठा आधार देण्याचे काम भाजयुमोने केलेले आहे. विद्यमान मुख्यमंत्री कोरोनाच्या परिस्थितीमध्ये कोरोनाला भिऊन घरात बसत आहेत. तर माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमिवर जनसेवेसाठी सदैव घराबाहेर आहेत. तोच आदर्श कायम ठेवत निरपेक्ष भावनेने भाजयुमोच्या पदाधिकार्यांनी भाजयुमोचे शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नसेवेचे काम सुरू ठेवलेले आहे. कोरोनाच्या परिस्थितीतही पदाधिकार्यांनी हे काम सुरू ठेवलेले आहे. त्यामुळे हे विधायक काम करताना स्वतःची व स्वतःच्या परिवाराची काळजी घ्या. असे भावनिक आवाहनही आ.अभिमन्यु पवार यांनी यावेळी बोलताना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा युवा मोर्च्याचे शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अब्दुल गालीब शेख यांनी केले. या कार्यक्रमाला भाजयुमोचे शहर जिल्हाउपाध्यक्ष गजेंद्र बोकण, सरचिटणीस गणेश गोजमगुंडे, सरचिटणीस सागर घोडके, संतोष तिवारी, कार्यालय प्रमुख आकाश बजाज, चंद्रशेखर पाटील,पंकज देशपांडे, रविशंकर लवटे, प्रेम मोहिते, आकाश पिटले, शुभम पाटील, महादेव पिटले, आदित्य कासले, अविनाथ डुमने, पवन बिडावेजी, पांडूरंग बोडके, यशवंत कदम, राजेश पवार, ओम धरणे, अजय कोटलवार यांच्यासह भाजपा पदाधिकारी व जेएसपीएम परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## पोलिसांची अलगिकरण केंद्राला बेड्स आणि साहित्याची मदत!



**वाडा/प्रतिनिधी**

कोविड-१९ चा वाढता प्रभाव लक्षात घेता कोरोना रुग्णासाठी कोविड सेंटरला बेड अपुरे पडत आहेत. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे. तसेच हायरिस्क पेशंट हे इतरत्र फिरवल्यामुळे कोरोना संसर्ग वाढत आहे. ही वाढ रोखण्यासाठी शासनाने कोविड-१९ आयसोलेशन (अलगिकरण केंद्र) सेंटर वाढविण्याचे ठरविले आहे. या अनुषंगाने वाडा तालुक्यात हमरापूर, खानिवली, कुडूस येथे आयसोलेशन सेंटर वाढविण्यात आले आहेत. येथील रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधीर संखे यांच्या वतीने बुधवारी (दि.१८) जिल्हा परिषद केंद्र शाळा हमरापूर, जिल्हा परिषद शाळा खानिवली व ग्रामपंचायत कार्यालय कुडूस या तीन केंद्रांमध्ये एकूण २५ बेड्स गादी, बेडशिट, उशी व उशी कव्हर असे साहित्य पुरविण्यात आले आहेत.

## चढ्या भावाने खत विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांचे परवानेच रद्द करा!

### राष्ट्रीय समाज पक्षाचे तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यात चढ्या भावाने खत विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र वाल्यांचे परवाने रद्द करणे व तालुका कृषी कार्यालय तील सर्व कर्मचारी मुख्यालय राहण्याबाबत रासपचे अनंद जिवणे यांनी निवेदनात म्हणले आहे. थोड्या दिवसात पेरणीचे दिवस तोंडावर आल्याने देवणी शहर व देवणी तालुक्यातील शेतकरी बांधवांना आत्तापासूनच खत मिळवणे यासाठी शहर व तालुक्यातील देवणी, वलांडी, बोरोळ, जवळगा अशा सोयीच्या ठिकाणी खरेदी करावे लागते म्हणून अनंद जिवणे यांनी खताची विचारणा केली असता खताची जी किंमत आहे. त्या किंमती प्रमाणे खत न देता चढ्या भावाने खत विक्री करीत आहेत.

यात शेतकऱ्यांचा नाविलाज झाला असून काही शेतकरी खरेदी करीत आहेत. याचा अर्थ लातूर जिल्ह्यात दोन मंत्री असून खताची चढ्या भावाने विक्री केली जात असल्याने जिल्ह्यातील मंत्री हे कृषी सेवा केंद्र वाल्यांचे कि शेतकऱ्यांचे मंत्री आहेत, असा सवाल शेतकऱ्यांतून केला जात आहे. महाआघाडी सरकार खता बाबत मोठ्या प्रमाणात जागरूकता म्हणून चढ्या भावाने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र वाल्यावर कठोर कारवाईचे संकेत दिले असले तरी तालुका कृषी कार्यालयाचे तालुका कृषी अधिकारी व कर्मचारी सहाय्यक कृषी अधिकारी हे कृषी सेवा केंद्राची दुकानदाराकडून आर्थिक संगणमत करून कृषी सेवा केंद्र दुकानदारांना पाठीशी घातले जात आहे. यात एकही अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत व लातूर उदगीर निलंगा येथून चार ते आठ दिवसाला येऊन काम पाहतात तरी यांच्यावर जिल्हाधिकारी यांनी तात्काळ दखल घेऊन चढ्या भावाने विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र दुकानदारांचे परवाने रद्द करावे व मुख्यालयी राहत नसलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करावे अन्यथा राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने सनदशील मार्गाने योग्य ते आंदोलन करण्यात येईल असे निवेदन तहसीलदारा मार्फत जिल्हाधीकारी यांना दिलेल्या निवेदनात रासपाचे अनंद जिवणे यांनी म्हणले आहे.

## ग्रामीण रुग्णांच्या सेवेत आणखी एक रुग्णवाहिका

**वाडा/प्रतिनिधी**

वाडा ग्रामीण रुग्णालय हे मध्यवर्ती ठिकाणी असल्याने वाडा तालुक्यातीलच नव्हे शेजारील इतर तालुक्यांमधूनही रुग्ण येथे उपचारासाठी दाखल होत असतात, कांही वेळा रुग्णांना ठाणे, मुंबई येथे अधिक उपचारासाठी पाठवायचे असते अशा वेळी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाची १०८ ही रुग्णवाहिका सुद्धा वेळेवर उपलब्ध होत नाही, परिणामी रुग्णांना खाजगी वाहनाने मोठे रुग्णालय




गाठावा लागते. त्यात वाडा ग्रामीण रुग्णालयाची एक रुग्णवाहिका जुनी झाल्याने नेहमीच नादुरुस्त असते. म्हणून येथील वैद्यकीय अधिक्षक डॉ.सुनील भडांगे यांनी जिल्हा आरोग्य विभागाकडे मागणी केल्याने एक नवीन अत्याधुनिक रुग्णवाहिका उपलब्ध झाली आहे. सध्या कोरोना बाधित रुग्ण वाढत असल्याने अशा रुग्णांना इतर रुग्णालयात हलविण्यासाठी या रुग्णवाहिकेचा चांगलाच उपयोग होणार असल्याने रुग्णमित्र प्रा.किरण थोरात यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले आहे. जुनी रुग्णवाहिका दुरुस्तीसाठी पाठविण्यात आली असून ती दुरुस्त होऊन आल्या नंतर वाडा ग्रामीण रुग्णालयात एकूण तीन रुग्णवाहिका होतील आज उपलब्ध झालेली रुग्णवाहिका अत्याधुनिक असल्याने यात रुग्णांसाठी उपयुक सुविधा उपलब्ध आहेत, असे वाडा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. सुनील भडांगे यांनी सांगितले.